- स्वत:ला सुखप्राप्ती व्हावी यासाठी मनुष्य संसारात धडपडत असतो या सर्व प्रयत्नांपासून त्याला दु:ख प्राप्तीच होते. मनुष्यदेहास जीवाला इंद्रिये आपल्या तृप्तीसाठी छळत असतात. म्हणून देहावरील आसक्ती कमी करावी.

## ।।शाश्वत मृत्यूची अनिश्चितता।।

- अगोदरच सर्व भोग भोगून नंतर परमार्थाकडे वळू असे म्हटले तर देहाची एवढी शाश्वती कुठे आहे? मृत्यू त्याला गिळण्यास प्रतिक्षणी टपूनच बसला आहे. वेळ येताच तो देश, परदेश, रात्र, दिवस, वृद्ध-तरूण, काही पाहात नाही. मृत्यू अत्यंत क्रूर असून त्याला दयामाया मुळीच नाही.— असा शत्रू दाराशी खडा असताना जे आळसात दिवस घालवतात ते पार बुडाले असे समजा!
- निद्रा, तंद्री, चिंता, खेद उद्वेग शिथिलता व आळस याना दूर हाकलून देऊन रात्रंदिवस अविश्रांतपणे आत्मचिंतन करावे आत्मसुख साधण्यासाठी उतावीळ व्हावे.
- काम, क्रोध, लोभ, चिंता, निंदा, गर्व, सर्वसंग्रहवृत्ती या सर्व उपाधी मनुष्याजवळच आहेत. पशुजवळ नाहीत. विषयसुखाच्या बाबतीत पशु नियमित मर्यादा पाळतात मनुष्य त्याहीबाबतीत मर्यादा पाळत नाही. या विषयवासना सोडण्यासाठीच मनुष्य जन्म लाभलेला आहे.
- प्रपंचाची व आपली संगती नित्याचीच आहे. परंतु ज्याचे मन निर्लेप राहाते तो पुरुष साधू समजावा
- निंदेसारखे अधोगतीला नेणारे दुसरे पाप नाही.
- सद्गुरुभक्ती ही मोक्षप्राप्तीहूनही श्रेष्ठ आहे असे भगवंताचे वचन आहे.
- हरीनामाच्या प्रभावाने निषिद्ध कर्म समूळ नष्ट होते.
- खऱ्या साधकाला लौकिक, मानसन्मान, घरदार, मठ परिवार यांची मुळीच आवड नसते. त्याला एकांतवासामध्ये खरा आनंद वाटत असतो.
- निरभिमानता, निर्मत्सरता, दक्षता, देहममत्व, अहंकार त्याग, सद्गुरु आपला पिता, माता, बंधू, मित्र आहे असा पूर्णभाव, अंत:करणाचा निश्चलपणा, परमार्थविषयी अत्यंत जिज्ञासा व आस्था, साधकाकडे या सद्गुणांची ठेव असते.

## ।।नामभक्ती हा सोपा मार्ग।।

- साधकाने संसारात स्त्री, पुरुष, घर, शेत, द्रव्य, किंवा आप्तेष्ट यांच्यावर फाजील आसक्ती न ठेवता उदासीन वृत्तीने राहावे मात्र त्या बाबतीतील आपले कर्तव्य चूकवू नये.
- अज्ञानाचा नाश झाला की प्रपंचाचा आभास निमाला म्हणून समजा.
- हव्यासापोटी सर्वस्वी अध:पात होतो.
- 'एकत्त्व जाऊन' 'अनेकत्त्व' आले की पारतंत्र्य आलेच! अनेकत्त्वात भयाचा जन्म होतो. एकत्त्व आले की जीव निर्मल, स्वतंत्र, आनंदमय बनतो.
- जशी ज्याची श्रद्धा तसा त्याला मी दिसतो असे श्रीकृष्ण म्हणतात.
- सर्वांच्या हृदयातील जाणणारा असा ईश्वर असल्याने त्याला 'अंतर्यामी' असे नाव आहे.
- विषयसेवनापासून जो सर्वथा अलिप्त असतो तो 'नित्यमुक्त' जाणावा. त्याला प्रपंचातील सुखदु:खं सारखीच वाटतात.
- 'द्रव्याचा लोभ' व 'स्त्री-आसक्ती' ही ज्याला सुटत नाही त्याच्या हातून खरा परमार्थ घडणे फार कठीण
- विवेक असेल तर बुद्धीला प्रगल्भता येते.
- जो बोलतो एक व करतो एक त्याच्या जवळ आत्मज्ञान कसले?
- जो पराधीन असतो तो जीवंत असूनही मृतवतच.
- अति लोभामुळे नातेवाईक, मित्र, शत्रू, बनतात. प्रसंगी जीवालाही मुकावे लागते.
- 'नाममार्ग' हा सर्वात सोपा, सुलभ व जवळचा मार्ग होय.

■ ■ ■

# विवेक विचार

**चं. वि. जोशी** औरंगाबाद

***व्यवहार असो वा परमार्थ असो दोन्ही ठिकाणी विवेक महत्त्वाचा आहे. म्हणूनच समर्थांनी म्हटले आहे की- 'विवेके क्रिया आपुली पालटावी।' विवेकानेच आपणास परम शांतीची प्राप्ती होऊ शकते. असा हा विवेक विचार करुं तेव्हढा थोडा आहे. त्यावरील श्री. जोशी याचे विचार अनेकांच्या विचाराला दिशादर्शक ठरावेत.***

विचार हाच जीवनातल्या प्रकाशाचा आत्मविचार, म्हणजे या विषयी प्लेटो म्हणतो "विचार म्हणजे आत्म्याने आत्म्याशी केलेले हितगुज" विचार विवेकाचा महिमा सर्वच संतानी गायिलेला आहे. आत्मस्वरुपाची जाणीव, ओळख विचारानेच होते. ज्याला आपण मोक्ष म्हणतो तोही विवेकानेच लाभतो.

**"भोळा भाव सिद्धीस जाव। हा तो उधारीचा उपाय। रोकडा मोहाचा अभिप्राय, विवेके जाणावा। विचार हेच सर्व श्रेष्ठ साधन आहे.**

विचार माणसाच्या अंतःकरणात स्फुरतातच पण त्या विचाराची गती व स्थिरता आपल्या जीवनात स्थिर करणे ही महत्वाची गोष्ट आहे.

वाचता वाचता, बोलता बोलता, श्रवणाने आपल्याला निरनिराळे विचार समजतात. आपण प्रवचन साहित्य या मार्गानेही विचार समजून घेतो. परंतु ते विचार आपल्या विचारांशी कितपत सहमत आहेत, आपली श्रद्धा किती टिकते हे महत्वाचे आहे. विचार हा बुद्धीचा विषय आहे. अनंत प्रकारच्या श्रवणाने पाहण्याने तिच्यात निरनिराळे भाव निर्माण होतात. पण ज्याला आपण विचर म्हणतो तो विचार साधनेने केलेल्या अभ्यासातूनच स्थिर होतो. काही त्यामागे साधना आहे. ती साधना नसेल तर विचार असू शकतो परंतु तो विचार जीवनात सुख-स्थिरता आणू शकेलच असे काही सांगता येत नाही.

### निदिध्यास महत्वाचा

विचार श्रवणाने कळतो परंतु त्याला मनन हवे. नंतर निदिध्यास हवा. तरच तो प्रकाशमान होतो. गुरुकृपाही हवीच. विचाराचा जन्म आत्मप्रसन्नतेची खूण आहे. अध्यात्मिक विचारात एक प्रकाश असतो. कारण त्यात साधना आहे. तपस्या आहे. ज्ञानाचा जन्म सत्वातूनच होतो. "सत्वातुनी निघे ज्ञान" म्हणजे ज्ञानाचा उदय सत्वाशिवाय होत नाही.

स्वयंप्रकाशित विचार माणसाच्या जीवनात येऊ शकतो. त्यासाठीच त्याला संयम व अभ्यास हवा अभ्यासाने ही गोष्ट होऊ शकते. विचाराची प्रभा अंतरात निर्माण होणे ही गोष्ट नैसर्गिक आहे. निसर्गतःच ही शांती असते परंतु हा निसर्ग सर्वत्र सारखाच असू शकतो असे दिसत नाही. माणसे सर्वच असतात. परंतु विचारवंत होत नाहीत. त्याचे

कारणच हे असावे की निसर्गत: ही त्याच्यात वृत्ती नसावी. किंवा साधना नसावी. साधना करण्याची वृत्ती व्हायला तरी प्रेरणाच व्हावी ती प्रेरणा निर्माण होण्यासाठी संत सहवास, गुरुकृपा, आणि आत्मकृपा लागते. आत्मकृपा असेल तर ओपोआपच सर्व चालते. आत्मकृपा म्हणजे ईश्वर कृपा. ज्याला आपण नैसर्गिक म्हणतो अशी माणसे प्रज्ञायुक्त प्रतिभासंपन्न असतात. अशी माणसं एक विचार करु शकतात, ठेवू शकतात. तेच इश्वरी असतात.

## मी म्हणजे आत्मस्वरुप

"वक्त्यांचा सत्ववाद मी" त्या अगोदर म्हणतात "विद्यात आत्मविद्या मी" जी विद्या आत्मविद्या व त्याचा जो विचार आहे तो मीच आहे. मी म्हणजे आत्मस्वरुप होय असाच भगवंताचा आशय आहे.

आपण जस जसा विचार करु लागतो तसे तसे आपल्याला स्पष्टच दिसते. विचार हाच खरा जीवनाचा आधार व प्रकाश होय.

ज्ञानासारखे पवित्र व श्रेष्ठ असे दुसरे कोणतेच नाही व त्याचा उगम अंतरात होतो. ज्या विचाराचा लाभ संयम व श्रद्धा आहे.

आपण जसा जसा विचार करु तसे तसे आपल्याला जीवनाचे पैलु व मार्ग दिसतात. जीवन म्हणजे काय? त्याचे सुख व मूल्ये कोणती? जीवनाची सफलता कशात आहे. आपण काय करावे व काय करु नये अशा विचाराचे चक्र सुरु होते. ती विचारधारा माणसाला सारखी फिरवते आपण विचार करतो, मांडतो, ऐकतो, सांगतो परंतु ज्ञानयुक्त विचार म्हणजे काय? कोणत्या विचाराने सफलता होईल. व कोठे श्रद्धा ठेवावी हे निश्चित लवकर कळत नाही. कळले तरी लवकर श्रद्धा बसत नाही. श्रद्धा जरी बसली तरी तो विचार आचरणात आणण्याची शक्ती व उत्साह येत नाही. म्हणून विचार करणे हे महत्वाचे परंतु तो श्रद्धेने स्थिर करणे व स्थिर करुन तो आचरणात आणण्याचा प्रयत्न करणे ही सारी सतत साधना चालू ठेवणे यालाच अभ्यास म्हणतात. अभ्यासच जीवनात विचार स्थिर करु शकतो. त्याने प्रकाश लाभतो.

जे ग्रंथ तत्वदर्शी आहेत, ज्याला आपण धर्मग्रंथ व शास्त्र म्हणतो, असे ग्रंथ व आपला आत्मविचार याचा समन्वय करताना देखील मुक्त विचार ठेवण्याची दृष्टी ठेवली पाहिजे. अमकाच ग्रंथ किंवा धर्म माझा असे न समजता आपल्या स्वधर्म स्वरुपी राहणे. हा स्वधर्म आहे. हे समोर ठेवावे. **सर्व धर्माची स्थापना जी निरनिराळ्या मार्गानी व विचारांनी व आपल्या समोर आहे. त्यात एक समाजाच्या व्यावहारिक जीवनातल्या बाजूचीही दृष्टी आहे. म्हणूनच कोणत्याही धर्मग्रंथाकडे पाहताना त्याची आत्मिक प्राप्तीची विचार धारा कोणती हे पाहणे आवश्यक आहे.** आपल्यासमोर विचार करताना धर्मग्रंथ व संत महात्मा तत्वदर्शी या सर्वाचा विचार आपल्या पुढे असतो तो आपल्या श्रद्धेप्रमाणे असणे स्वाभाविक आहे. परंतु तीच श्रद्धा विवेक युक्त-असावी. विवेका शिवाय असणे हे तामसी व असुरी लक्षण आहे. म्हणूनच विवेक युक्त श्रद्धा हवी. कारण श्रद्धेशिवाय विचार हा आचरणात नाही व विचार आचरणात असल्याशिवाय अर्थ नाही भाग्य नाही. **आपण निरनिराळ्या धर्माची मूलतत्त्वे पाहतो. जो धर्म कोणताही असो अमकाच धर्म श्रेष्ठ असे नाही. धर्मानुयायांची संख्या लहान मोठी असू शकेल परंतु तो धर्म लहान आहे. असे मात्र नाही. धर्माची महती अनुयायांच्या संखेवर नाही तर त्याच्या तत्वमुल्यांच्या अस्तित्वावर आहे.**

आपण कशासाठी जगतो याचे उत्तर न विचार करताही सामान्यापासून ते मोठ्यापर्यंत सहज कोणीही देईल की माणूस जगतो ते प्रेम, ज्ञान, शांती व आनंदासाठी. गीता तर म्हणते "शांतीविण कसे सुख" ज्ञानाशिवाय पवित्र व श्रेष्ठ कांहीच नाही. प्रसन्नतेने सर्व दुखे . झडून जातात. बुद्धीची स्थिरता होते व प्रेम हा तर कृष्णाच्या जीवनाचा स्थायी भाव आहे.

■ ■ ■

# साधक, साधना व साध्य

माधवराव भागवत (ठाणे)

***प्रत्येक माणसाच्या जीवनात एकदा तरी अशी वेळ येतेच कि त्यावेळी त्याचे सर्व मानवी उपाय थकलेले असतात, व दैवी-उपायांवरच त्याला अवलंबून राहावे लागते. मग तो आपोआपच भक्तिमार्गाकडे वळतो. साधना करून साधक बनतो.***



या चराचर सृष्टीमध्ये माणसांची खूप गर्दी आहे, पण त्यांचेएकंदर चारच वर्ग आहेत. ते म्हणजे बद्ध मुमुक्षु, साधक, अन सिद्ध. या व्यतिरिक्त पाचवा वर्ग नाही. अंध माणूस अंधारामध्ये जसा चाचपडत असतो, तसा बद्ध माणूस अज्ञान अंध:कारात चाचपडत असतो. आंधळा माणूस असतो त्याला डोळे नसतात, त्याला डोळ्यांनी दिसत नाही, त्यामुळे त्याला चारी दिशा शून्य असतात. तशी बद्धाची अवस्था असते. त्याला ज्ञानदृष्टी नसल्याने परमात्मा आत बाहेर असूनसुद्धा त्याला दिसत नाही. परमात्मा त्याच्या हृदयातच असतो, अन् तो मात्र जगभर शोधत हिंडत फिरत असतो. जसे-काखेत कळसा गावाल वळसा **'तुझे आहे तुजपाशी। परी तूं जागा चुकलाशी'** अशी अवस्था बद्धाची असते.

बद्धाला भक्तस ज्ञानी, वैरागी, योगी, तापसी, संन्यासी विरक्त समोर आले तरी दिसत नाहीत. तो त्यांना ओळखूच शकत नाही. सत्य, असत्य, चांगले, वाईट, कोण सज्जन, कोण दुर्जन, कोण वाईट, कोण चांगला, त्याला समजत नाही. तो ओळखूच शकत नाही. त्याला सारासार विचारहि नसतो. स्वधर्माचा आचार, विचार परोपकार, दानधर्म पुण्य, यापैकी त्याला काहीही कळत नाही. त्याच्या पोटात भूतदया नसते, प्राणीमात्रांबद्दल प्रेम नसते. लोकांचे अंत:करण शांत करणारी मृदू अन् गोड, रसाळ वाणी नसते. भक्ति, ज्ञान, वैराग्य साधन, ध्यान, मोक्ष वगैरे काहीही नसते.

## बद्ध जीवाची दशा

इतकेच काय त्याचा देव सुद्धा एक निश्चित नसतो. त्याची भक्तिसुद्धा त्यामुळे डळमळीत, विचलित, अस्थिर अशीच असते. त्यासर्वाचा परिणाम म्हणून त्याची श्रद्धा आणि साधन हे सुद्धा स्थिर नसते. त्याला 'परमार्थाची खूण' कळत नाही. अध्यात्म निरुपण कळत नाही. मी कोण?, मी कुठून आलो? मला कुठे जायचे?, माझे अंतिम ध्येय काय? वगैरे काही कळत नाही, म्हणजे त्याला स्वस्वरुपाचे ज्ञान नसते, स्वस्वरुपाची ओळख नसते. आपले साधन कुठले, त्या साधनाचे फळ काय हेहि त्याला कळत नाही. मी कोण हे ज्ञान नसणे म्हणजेच स्वस्वरुपाची ओळखण नसणे, म्हणजे आत्मज्ञानाचा अभाव असणे, म्हणजेच तो बद्ध आहे, हे बद्धाचे मुख्य लक्षण होय. जप तप, ध्यान, ज्ञान, व्रते, वैकल्पे दान, भक्ति, तीर्थे, यज्ञ, याग, यापैकी त्याच्याजवळ काहीच नसते. त्याठायी सद्गुणांऐवजी दुर्गुणांचाच वास असतो. इतकेच नव्हे तर त्यांच्याअंगी नानातऱ्हेचे दोषच असतात. तो दुसऱ्याची टिंगल टवाळीच करतो. जाणूनबुजून तो दुसऱ्याचा उपमर्दच करतो, अपमान करतो, काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ हे षड्रिपू नित्य ठाण मांडून बसलेले असतात. भांडण, तंटा, अभिमान, ताठा, इंद्रियभोग, इत्यादि दुर्गुणांचा साठाच त्याच्याजवळ असतो. भ्रष्टपणा, अनाचार,

अत्याचार, वाचाळपणा पाखंडीपणा, अशा दुर्गुणांचा त्याच्या ठायी अतिरेक झालेला असतो.

द्रव्य, दारा, हेच त्याचे 'जीवनसर्वस्व' झालेला असतो त्याचे जवळजवळ सर्व जीवन खर्ची पडलेले असते. त्याच्याजीवनात पैसा, स्त्री यांनाच 'सर्वोच्च्य स्थान' असते. त्याला संतसंग, याची गोडी नसतेच. त्यातच तो धन्याता मानतो. तो देहबुद्धिने घट्ट बांधलेला असतो. म्हणूनच 'बद्ध' असतो. त्याच्या शरीरांतील सर्व गात्रे धन, दार व व्यसनासक्ती, यातच रममाण असतात. त्याला जागृती, स्वप्न, तोच ध्यास असतो. रात्रंदिवस त्याचे तेच चिंतन असते अशा हा बद्ध इतका स्वैर वागूनसुद्धा त्याची कधी तृप्ती होतच नाही. तो कधीहि पूर्ण समाधानी होतच नाही. पण त्याच्या आयुष्यात, त्याच्याच काय सर्वांच्याच आयुष्यात एक वेळ अशी येतेच कि, त्याला जबरदस्त फटका बसतो, तडाखा बसतो, त्यावेळी त्याची सर्व मग्रुरी, गुर्मी, ताठा, अहम् पार उतरलेला असतो. सर्व मानवी उपाय हरलेले असतात, दैवी उपायावरच त्याची भिस्त असते. आणि ईश्वराला शरण जाण्याशिवाय दुसरा मार्ग नसतो.

मग तो भक्तिमार्गाकडे वळतो. त्याचवेळी त्याचे डोळे उघडतात. तो पूर्ण शुद्धीवर येतो, व त्या जगनियंत्या, विश्वनियंत्या ईश्वराचे अस्तित्व मान्य करतो. त्याचवेळी त्याला हेहि कळून चुकते कि, ज्या धन, आणि दारेपायी आपण आजवर 'जीवाचे रान' केले, ती सर्व त्याला सोडून निघून गेलेली असतात. अंतकाळी कुणाहि जवळ राहात नाहीत. ज्यांच्यासाठी सारे आयुष्य, पैसा, कष्ट, खर्च झालेले असते, ती सारी त्याला सोडून तरी जातात किंवा ईश्वरी कोप होऊन त्याची लाडकी प्रिय पत्नी किंवा मुलगा त्याला सोडून देवाघरी तरी निघून गेलेली असतात. नोकरी, धंदा, व्यवसाय, उद्योग यात त्याला जबर खोट येते. पैशापरी पैसा जातो अन् मानहानी ही पत्करावी लागते. असा चारीबाजूनी दैवाचा तडाखा बसल्यावर त्याचे डोळे उघडतात पण तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते. त्याला असे वाटते कि, आपले चुकले आपण असे वागायला नको होते. अशा तऱ्हेने त्याच्या विचारात सुयोग्य बदल होतो.

## ।।जीवन परिवर्तन।।

इथेच त्याच्या जीवनाला कलाटणी मिळते, त्याचे जीवन आता आमूलाग्र बदलू लागते, नव्हे त्याचा 'पुनर्जन्मच' झालेला असतो. हळूहळू त्याला चांगले काय, अन् वाईट काय याचा विचार करण्याची बुद्धि येते, प्रेरणा मिळते, त्याला कुवत येत. म्हणजेच सत् काय अन् असत् काय हे जाणण्याची व जाणून घेण्याची इच्छा होते. तीव्र इच्छा होते, अन् मग तो बद्धावस्थेतून 'मुमुक्षू' अवस्थेत प्रवेश करतो. आता तो बद्धाचा मुमुक्षू झालेला असतो. त्याने बद्धावस्था ओलांडलेली असते पार केलेली असते. त्याचा आचार, विचार, आणि कृतीत लक्षणीय बद्दल झालेला असतो. आता तो थोडा विचारवंत झालेला असतो, म्हणून प्रत्येक बाबतीत मनःपूर्वक विचार करतो. त्यावर मग चिंतन, मनन, करतो. या विचारमंथनांतून त्याला दूध कुठले व पाणी कुठले हे समजू लागते, मग तो दूध एका बाजूला अन् पाणी एका बाजूला करतो यालाच 'नीर-क्षीर न्याय' म्हणतात. अन् ते फक्त हंसालाच जमते कावळ्याला नाही.

आतां त्याचे मन अविचल झालेले असते. द्रव्य व दारा यांचेविषयी तो आपली इंद्रिये निश्चल करतो, त्यांना चचल होऊ देत नाही. त्याचे शरीर व मन अनुतापाने पोळलेले असते, जुळलेले असते, म्हणजेच त्याला पश्चाताप होऊन त्याचा नवा जन्मच झालेला असतो. तो बद्ध होता तेव्हा देहभावात वावरत होता, त्याच्या सर्व आकांक्षा, आशा, भावना, वासना, हौशीहव्यास, देहसुखाभोवती केंद्रित होते, त्यामुळे त्याची बुद्धि भ्रष्ट झालेली होती. तिच्यावर सतत द्रव्य, दारा आणि प्रपंच यांचेच आघात सतत होत होत. तिला तिथून स्थानभ्रष्ट केल्याशिवाय, व तिचा देवभावाकडे वृत्ती वळविणे हे एकच आद्यकर्तव्य ठरत होते, म्हणजेच बद्धातून मुमुक्ष बनणे हेच त्याचे कार्य होते.

आत्मज्ञानाचे तळमळीमुळे तो साधू, संत महात्मे अवलिये, फकीर, बैरागी यांची संगत धरतो. त्यांनी सांगितलेली साधना, साधन, मनोभावे करुन तो आता दोन टप्पे पार केलेले असतात. एक तो बद्धांतून मुमुक्षू बनतो अन् दुसरा भव्य व दिव्य अशी प्रगतीच झालेली असते. तो संतसंग करतो. साधक जेव्हा संतसंग करतो, साधूच्या सहवासात राहतो, तेव्हा तो त्याच्याकडून खूप काही शिकतो. अनुसंधानाची विद्या शिकतो. मी देह आहे या भावनेत आत्तापर्यंत राहणाऱ्या साधकाने मी म्हणजे देह नव्हे, मी म्हणजे आत्मा आहे या धारणेप्रत

येणे म्हणजेच 'अनुसंधान' टिकविणे होणे. यालाच देहभावनातून देव भावात जाणे म्हणतात. ते केवळ अनुसंधानानेच करता येते.

## ।। आत्म्याचे अनुसंधान ।।

देहाचे अनुसंधान बाजूला ठेवून आत्मस्वरुपाचे अनुसंधान ठेवणेची युक्ती साधणे हेच साधकाचे साधनेचे मर्म आहे. त्यासाठी इंद्रियामध्ये पसरलेले मन एकवटून, गोळाकरून, त्याला हृदयकलांत घट्ट धरुन ठेवले पाहिजे. त्याला आत्म्याशी एकरुप केले पाहिजे, ते आत्म्याशी तदाकार पावले पाहिजे. म्हणजेच मी आत्मा आहे देह नाही. याची जाण होऊन, त्याप्रमाणे त्याची साधना, आचार, विचार, झाले पाहिजे. अशी युक्ती ज्याला साधेल, असे जो साध्य करील त्यालाच 'सच्च्या साधक' म्हणावे.

आता साधकाची व्याख्याच पहा. जो गुरुमार्गदर्शनानुरुप सुसाधनेद्वारे आपले इच्छित साध्य होईपर्यंत, इच्छित ध्येयाप्रत पोहोचेपर्यंत चिकाटीने, सातत्याने प्रयत्नांची पराकाष्ठा करुन आपले इच्छित पूर्ण करतो. यशस्वी होतो. यश मिळवतो. तोच सच्चा साधक होय. आता साधक म्हटला म्हणजे साधना आलीच. हे वरील विस्तृत व्याख्येवरुन समजेलच. जो साधना करुन आपले इच्छित साध्य करतो तोच 'साधक' होय. आता साधक जर अनेक प्रकारचे तर साधनाहि अनेक प्रकारच्या हे ओघाने आलेचय साधनेचे प्रकार असख्य, अगणित, आहेत. पण 'अघोरी साधना' ही निषिद्धच मानली जाते. तो खरा प्रकारच नाही.

साधना अनेक प्रकारची आहे. जप, व्रत वैकल्पे, उपास तापास, यम नियम, पूजा पाठ योगसाधना, भजन, कीर्तन, पुराण, वाचन, प्रवचन, पौराणिक, आध्यात्मिक ग्रंथाची पारायणे, जलसाधना, हृदयोग साधना, नवविधा भक्ति हाहि साधनेचाच प्रकार आहे. तीर्थयात्रा, होम हवन, यज्ञ, याग. कितीतरी प्रकार आहे. म्हणजेच साधक अनेक म्हणून साधनाहि अनेक पण सर्वांचे लक्ष एकच ईश्वर प्राप्ती. नरदेह, नरजन्म सार्थक, नवनाथ भक्तिसार, गुरुचरित्र वगैरे ग्रंथ जर वाचले तर साधनेचे अत्यंत अवघड, कठीण, अंगावर कांटा आणणारे असे भयंकर प्रकार आहेत. ज्याला जी आवडेल रुचेल, पचेल, झेपेल, जमेल ती साधना ती भक्ति करावी. पण साधनेविना आयुष्य घालवूच नये.

## अवर्णनीय आत्मिक आनंद

प्रत्येकाची ही नैसर्गिक वृत्तीच आहे, मी अमूक काही केले, तर मला त्याचे फळ हें मिळालेच पाहिजे त्याप्रमाणे त्याची अपेक्षा असते. तद्वत 'साधक' जेव्हा 'साधना' करतो, त्याचवेळी त्याला 'साध्य' हे अपेक्षितच असते. एकाद्याने रोज व्यायाम केला, सुरुवात केली की, आपल्या तब्येतीत किती फरक पडला. किती सुधारणा झाली, किती वजन वाढले, शरीराला किती वळखरपणा आला, स्नायू किती पिळदार झाले. किती बळकटी आली. कांतीला किती तजेला आला. हे तो पहिलवान वरच्यावर अजमावून बघतो. मला किती साध्य झाले. किती प्रगती झाली, झाली कि नाही झाली. हे जाणण्याची त्याला तीव्र इच्छा असते. तशीच ती साधकाला सुद्धा असते. मी साधना करतो, आपले कुठे चुकले, कां चुकले या विषयीं तो जाणकारांकडून, तज्ञांकडून मार्गदर्शनहि घेतो. तो स्वतः त्रयस्थाच्या भूमिकेंतून याचा अभ्यास करतो. आणि जर त्याने अनुसरलेला मार्ग, कार्यपद्धती, साधन, साधना, बरोबर असेल, त्याची प्रगती होत असेल, तर त्याला मिळणारा 'मानसिक आनंद' 'सात्विक आनंद' हा आत्मिक आनंद असतो, अन् तो अवर्णनीय, अन् 'सात्विक आनंद' हा आत्मिक आनंद असतो., अन् तो अवर्णनीय, अन् अतुलनीय असाच असतो.

साधक साधने द्वारा जेव्हा 'सिद्ध' बनतो. तेव्हां त्या साधनेच्या बळाने साधनेच्या शक्तिमुळे त्याला अनेक 'सिद्धि' प्राप्त होतात. त्यासाठीत्याला मुद्दाम असे कांही करावे लागत नाही, कारण तो साधनेचा प्रभाव असतो. साधकाच्या जीवनांत हेच खरे धोक्याचे ठिकाण आहे. साधक जर त्या सिद्धिच्याच नादी लागला, त्याच्याच प्रभावात गुरफटला, सिद्धिंचा वापर स्वतःच्या स्वर्थासाठी करु लागला तर, चार दिवस त्याची महती वाढेल पण पुढचा मार्ग जो 'ब्रह्मपद' प्राप्ती तो कायमचा बंद होईल. म्हणूनच साधकाने सिद्धिच्या नादी लागूच नये.

साधकाला साधना ही कायम आवश्यक आहे. साधकावस्थेत तो असतांना केलेली साधना ही गुरुकृपेसाठी असते. अन् गुरुकृपेनंतर केलेली साधना ही गुरुकृपा कायम टिकण्यासाठी असते. दुसरे म्हणजे साधक काय अन् सिद्ध काय त्याच्या दैनंदिनजीवनात पाप हे घडतच असते पण साधना केल्यामुळे पुण्यरास कमी होत नाही, पापक्षय होतो. म्हणून साधना ही हवीच.

■ ■ ■

रामनाम एक सिंध्द मंत्र

# नामजपाचे वैज्ञानिक महत्त्व

भा. के. गन्द्रे (ठाणे)

***नामजप हा ईश्वराचे स्वरुप आहे. खुद्द भगवान कृष्णांनी गीतेत अर्जुनाला आपल्या या स्वरुपाबद्दल सांगितलेले आहे. नामजप ही केवळ भाबडी-अंधश्रद्धा भक्ती नसून त्यामागे विज्ञानाने सिद्ध करता येईल अशी सामर्थ्यशक्ती आहे. श्री गन्द्रे यांच्या या लेखाद्वारे नामजपाचे - प्रार्थनेचे महत्व आपणास कळून येईल व आपणही नामजपाचा श्रीगणेशा कराल अशी अपेक्षा आहे. 'श्रीसाई' या जपाने चमत्कार वाटावा अशा घटना घडल्याचे अनेक वाचक सांगतात त्यामागील रहस्य या लेखाद्वारे आपणास समजून येईल.***

राम-नामाचे नाद ब्रह्म विश्वाच्या पोकळीत वर्षानुवर्षे भरून राहिले आहे. शतकानु-शतके अनेक साधक 'राम' नामाचा जयजयकार करीत आहेत. त्यामुळे अनाहूत ताकद, शक्ती त्या-त्या साधकाला सहज मिळत आहे. प. पू. रामदास स्वामींनी राम नामाचा प्रचार करतांनाच शक्तिची उपासना करण्यासाठी अकरा मारुतींची स्थापना केली, व अध्यात्मा बरोबरच शक्ती-ताकद-बळ यांचे जीवनांतील महत्व जनतेली पटवून दिले. दासबोधासारखा ग्रंथ सहज, सोप्या भाषेत लिहून जनजागृती केली. रामरक्षा, करूणाष्टके मनाचे श्लोक आजहि लोकप्रिय आहेत. रामदासांनंतर रामनामाचा जोरदार प्रचार श्री गोंदवलेकर महाराजांनी करुन आजतागायत राम नामाचे चैतन्य जागृत ठेवले आहे.

राम नामाची महती अगदी व्यवहारीक भाषेत जनतेला आपल्या रसाळ ३६५ दिवसांच्या प्रवचनाद्वारे देऊन त्यांनी सतत केव्हाहि राम नाम घेण्याचा मूलमंत्र दिला असून, हे नाम घेणाऱ्याच्या मनांत कोणताहि विचार-विकार चालू असला तरी त्याकडे लक्ष न देता, वा त्याची काळजी न करतां सातत्याने नाम घेण्याचा बहुमोल सल्ला दिला आहे. व असे नाम घेणाऱ्याचे हित जपण्यासाठी मी अखंड त्याच्या पाठीशी उभा आहे, अशी ग्वाहीहि विश्वासाने दिली आहे.

सामाजिक नितीमत्ता सुधारण्यासाठी रीतीप्रचार आणि वैयक्तिक नितीमत्ता व ईश्वरानिष्ठा दृढ व्हावी म्हणून रामनामाच प्रचार करण्यांत आपले आयुष्य झोकून देणारे श्री. श्रीपाद ह. भिडेसास्त्री (चालक, गीता शांतीमंदिर, सांगली) यांनीहि ठिकठिकाणी प्रवचने देऊन जनतेला

नितीमूल्ये जपण्याचा संदेश दिला आहे. भारतात तसेच पाश्चात्य देशांतहि त्यांची प्रवचनाचे काम अखंड चालू केले. राम-नाम्याच्या जपाच्या द्वारा होणाऱ्या चिन्ताच्या एकाग्रतेमुळे **"मनी धरावे ते होते, विघ्न अवघे निमोनी जाते."** या समर्थोक्तीचा अनुभव त्यांनी प्रत्यक्ष घेतला आहे. उपासनेमुळे मनाची अस्वस्थता, निराशा व भिती ही नाहीशी होऊन **"समर्थाचिया सेवका वक्र पाहे असा सर्व भूमंडळी कोण आहे."** हा आत्मविश्वास वाढीस लागतो. श्रद्धापूर्ण मनाने हया उपासनेने शारिरीक व मानसिक रोगांवर अभाव पडून ते दूर होतात. याचीही प्रचिती त्यांना आली आहे.

शाळा, कॉलेजांत विद्यार्थ्यांनी हल्ली कांही वेळ जपाच्या द्वारा मन एकाग्र करण्याचा अभ्यास केल्यास विद्येचे संस्कार त्यांच्या मनावर उत्तम होऊन तो विद्यार्थी यशस्वी होऊन नितीमान बनेल अशी त्यांना उमेद वाटते. कै. गुरुवर्य रानडे (निंबाळ) यांच्याकडून त्यांना राम-नामाची दीक्षा मिळाली व नंतर ह्या दिव्य राम-नामाचा प्रचार कसा करायचा ह्या एकाच ध्येयाने प्रेरीत होऊन त्यांनी प्रवचने करावयास सुरुवात केली व समस्या जनतेला ज्ञात व्हावे ह्यासाठी **"रामनामाचे शास्त्रीय रहस्य"** हे पुस्तक १ मे १९६० ह्या महाराष्ट्र-दिनी जनतेपुढे ठेवले. त्या रामनामाच्या रहस्याची फोड त्यांनी विविध अंगांनी केली असून त्यांचे हे छोटेखानी पुस्तक बहुमोली ठरले आहे. ह्या पुस्तकांतील त्यांचे विचार पुनःश्च जनतेपुढे ठेवून त्यांचा हेतू साध्य व्हावा व प्रचारकार्य चालू रहाणे यासाठीच ते विचार ह्या लेखाच्या रुपाने जनता जनार्दनापुढे ठेवीत आहे. भाविकांनी त्याचा मागोवा घेऊन समर्थ व्हावे ही प्रार्थना

## रामनामाची संजीवन मात्रा

श्री भिडे शास्त्री या पुस्तकरुपी प्रवचनाद्वारे म्हणतात की, आज आध्यामिक मूल्यवरील विकास कमी होऊन, भौतिक सुखवादामुळे अनेक लोक सत्ता व संपत्तीच्या मागे लागलेले दिसतात. ही परिस्थिती पाहण्याकरितां परमेश्वरावरील श्रद्धा डोळस करणे आवश्यक आहे. आधुनिक मानसशास्त्राच्या दृष्टीकोनांतून रामोपासनेचे महत्त्व-रहस्य सांगणे असा त्यांचा दृष्टीकोन आहे. आरोग्यशास्त्राच्या त्यांचा दुसरा दृष्टीकोन आहे. रामनाम म्हणजे सर्वरोग परिहार करणारी संजीवनी मात्रा आहे असे महात्माजी म्हणत.

**"कोण्याहि जिवाचा न घडावा मत्सर। वर्म सर्वेश्वरपूजनाचे।।** हे तुकाराम महाराजांचे वचन आहे. तसेच "प्रेमरुप व्हावे, प्रेमाने जग जिंकावे" हे प्रेमाचे सामर्थ्य आहे. म्हणून माणसाने दुसऱ्याविषयी द्वष-मत्सरादिक भावनांना मनांत धारा न देता, सर्वांविषयी प्रेमभावनाच मनांत बाळगावी. दुसऱ्याच्या कारणांचे चिंतन करावे, त्यामुळे आत्मकलाहि साधते. विचार संक्रमण ही प्रयोगविरुद्ध घटना आहे. आपल्या मनांतील विचार दुसऱ्या माणसाच्या मनांत संक्रमित करता येतात. विश्वशांतीकरितां सर्व मानवजात आज आसुसलेली आहे. शांतीमंत्राच्या पठणाने निर्माण होणारे चितनरंग सर्व ठिकाणी पसरावेत व त्यायोगाने जगात शांतीचे वातावरण निर्माण व्हावे हाच शांतीमंत्र रचणाऱ्या ऋषींचा उद्देश असावा. जगांत शांती नांदावी यासाठी सर्वांनी रोज रात्री झोपतांना श्रद्धापूर्ण मनाने हा पुढील शांतीमंत्र म्हणावा व त्या मंत्राच्या अर्थावर ५/७ मिनीटे मनन करावे. त्यामागे विश्वशांतीला षोषक असे विचारतरंग सर्वत्र पसरतील सर्व वातावरण ह्या शांतीमंत्राने भरून जाईल. व जगात टिकाऊ शांती निर्माण होण्यास ही कृती अत्यंत उपयुक्त ठरेल असा शास्त्रीजींचा होरा आहे:-

**सर्वे सुखिनः सन्तु**
**सर्वे सन्तु निरामयाः**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु**
**मा कश्चिद् दुःखमाप्नुयात।।**
**ॐ शांन्तिः शान्तिः शांन्तिः**

प्रत्येक माणसामध्ये विद्युतशक्ती असते. तिचे तरंग नेत्रावाटे बाहेर पडतात व विचार हे सुद्धा विद्युतशक्तीनेच तरंग होत. महाराष्ट्र दारिद्री का याची जी अनेक कारणे आहेत. तयात महाराष्ट्रीयांना श्रीमंत होण्याची खरी इच्छा नाही हे आहे! विश्वव्यापक परमेश्वर सर्व ऐकत असतो. जर एखादा एवढेच पुरे असे म्हणत असेल तर तो म्हणतो तथास्तु! जन्मभर मीठ भाकरीच खा, तुलाच जर जास्त नको तर मी तरी जास्त कशाला देऊ? ज्यांची मनोवृत्तीच असंतुष्ट ते वैभवसंपन्न कसे होणार? The dreams of today are realities of tomorrow "आजची स्वप्ने हीच उद्याची सत्य सृष्टी" हे महाराष्ट्रीयांनी पक्के

ध्यानांत ठेवावे. कारकुनीच्या डबक्यातून बाहेर पडून व्यापार व उद्योगधंद्याच्या समुद्रात पडण्याची महत्वाकांक्षा जोपर्यंत महाराष्ट्रीय लक्षण धरत नाहीत, तोपर्यंत महाराष्ट्राचे दारिद्र जाणार नाही व आम्हाला भारतात मानाचे स्थान मिळणार नाही.

## ''मनाची एकाग्रता: यशाची गुरुकिल्ली

ज्याचे मन आपल्या अंगीकृत कार्याच्या ठिकाणी पूर्णपणे एकग्र होते त्यांनाच यश मिळते. जीवनांतील यशाची ही गुरुकिल्ली विशेषत: विद्यार्थांनी ध्यानांत ठेवावी. ''मनाची एकग्रता हीच यशाची गुरुकिल्ली'' हे वाक्य सर्वांनीच ध्यानांत ठेवावे. ज्यांना आपल्या जीवनांत यश पाहिजे असेल त्यांनी चित्त एकाग्र करण्याचा अभ्यास करावा. पालकांनी व शिक्षकांनी, घरामध्ये व शाळेमध्ये रोज थोडा वेळ मन एकाग्र करण्यास विद्यार्थ्यांना शिकविल्यास त्याचा निश्चित फायदा होईल.

## ।। जपयज्ञ हेच माझे स्वरुप ।।

जपयज्ञ हे माझे स्वरुप आहे, असे भगवंतांनी गीतेत सांगितले आहे. जपयज्ञ म्हणजेच नामरुप चित्त एकाग्र करण्याचा हाच एक उत्तम उपाय आहे. ''वैखरी वाणीने'' (मोठ्याने) श्रीरामचा किंवा आपल्या इष्ट देवतेच्या नामाचा उच्चार करावयाचा हा पहिला प्रकार आहे. तर ओठांतल्या-ओठांत स्वत:लाच ऐकू येईल असा जप करणे याला उपांशु-जप म्हणताता. मनांतल्या मनात जप करणे याला ''मानसजप'' म्हणतात. हा तिसरा प्रकार सर्वातश्रेष्ठ असून, या जपाने एकग्रता लवकर होते व नामाचे संस्काराही मनावर खोल होतात. नामाचा (परमेश्वरी) मनातल्या मनांत जप करीत असतांना त्याच्या अर्थाचे अनुचिंतनही जपाबरोबरच चालू ठेवावे. इतर सर्व संकल्प-विकल्प बंद पाहिजेत. सुरुवातीला हे कठीण वाटले तरी निग्रहाने अभ्यास चालू ठेवला तर हळूहळू जे साधू शकते. व मन एकाग्र होते सतत प्रयत्न करणे याला अभ्यास व विषयलालसा सोडणे याला वैराग्य म्हणतात. जप करण्याची कोणती तरी वेळ ठरलेली असावी. पहाटे ४ ते ६ दरम्यान केव्हाही जप करावा. झोपेत विश्रांती मिळाल्याने मेंदू शांत असतो व यावेळी गडबड-आवाज नसल्याने मनाचा विक्षेप होत नाही. मलमूत्रादिकांचे विसर्जन करुन हातपाय स्वच्छ धुवून मगच जपाला बसावे. तेथे देवाच्या तसबिरी असल्यास, उद्बत्ती, कापूर, धूप यापैकी सुगंधी द्रव्ये जाळावीत. कृष्णाजिनावर मऊ कापडाची घडी घालून त्यावर बसावे. पाठ, मान, डोके हे एका रेषेत येतील असे पोक न काढता ताठ, बसावे. प्रार्थना गद्य वा पद्यांत असावी. यासाठी करुणाष्टके फार उत्तम आहेत.

परमेश्वराच्या प्रेमाने डोळ्यांत अश्रू आले पाहिजेत. असे प्रेमाश्रू ज्यांच्या डोळ्यांत येतात ते साधक धन्य होत! प्रेमपूर्ण मनाने प्रार्थना केल्यास चिंता, भय, दु:खे दूर होतात. प्रार्थनेने मन स्वस्थ झाल्यावर जपाला प्रारंभ करावा. श्वासउच्छ्वासाबरोबर जप करावा. श्वास घेतांना मनांतल्या मनांत 'श्रीराम' व श्वास बाहेर सोडतानांहि 'श्रीराम' असा जप करावा. प्रारंभीच्या काळांत मन अन्य विचाराकडे वळेल, विकार विचार त्रास देतात त्यांना जबरदस्तीने बाहेर घालविण्याचा प्रयत्न करु नये. त्या फालतू विचाराकडे लक्ष न देता, पुन्हा - पुन्हा रामनामाकडे मनाला वळवावे. मनावर जबरदस्ती नको. श्वास प्रच्छवास समांतर रीतीने चालू राहिले पाहिजेत. अशारितीने १५ मिनीटे ते १ तास पर्यंत नित्य-नियमाने अभ्यास करावा. वेळ हळू-हळू वाढवावा. मनावर ताण पडता उपयोगी नाही. जप झाल्यानंतर मनाला शांती व प्रसन्नता वाटली पाहिजे.

जप संपल्यानंतर पून्हा ५ मिनीटे प्रार्थना करावी. व **''सर्वो सुखिनः सन्तु''** ही प्रार्थना म्हणून अभ्यास पूरा करावा. त्यानंतर हळू हळू मन एकाग्र होऊ लागते. एकग्रतेने मानसिक सामर्थ वाढते. त्यामुळे यशसिद्ध होते व ध्येयहि साध्य होते. एकाग्र मनावर विद्याचे संस्कार फार उत्तम होतात. म्हणून जपाद्वारे एकग्रता साधावी विद्यार्थांना एकाग्रतेने उत्तम यश मिळते. गायत्री जप केल्यास उत्तम न पेक्षा निदान रामनामाचा जप करून मन एकाग्र करावे. ज्यावर आपली श्रद्धा असते त्यावर मनाची एकाग्रता लवकर होते. म्हणून आपल्या इष्ट देवतेचे ध्यान किंवा उपासना करावी. ''एकग्रता हाच यशस्वितेचा कायदा'' संत रामदास म्हणतात—

**''मनी धरावे ते होते**
**विघ्न अवघे निघोनी जाते**
**ृपा केलिया रघुनाथे**
**प्रचिति येते''**

ज्यांच्यावर रामाची कृपा होते, त्याच्या मनाचे संकल्प सिद्ध होतात, असे आत्मप्रचितीने त्यांनी सांगितले आहे. रामाची कृपा होण्यास "ठाईच बैसोनी करा एकचित्त" हाच सर्वोत्तम उपाय आहे. रामनाम जीवनांतील ध्येयसिद्धीला अत्यंत उपयुक्त आहे. "यत्न तो देव जाणावा" या समर्थांच्या उक्तीनुसार, ध्येयसिद्धी करितां चित्ताच्या एकाग्रते बरोबरच योग्य दिशेने निष्ठापूर्वक प्रयत्न करणेहि अत्यावश्यक आहे.

## ।। आरोग्य महत्त्वाचे ।।

उत्तम शरीरसामर्थ्य व आरोग्य हाच पराक्रमाचा व जीवनांतील आनंदाचा पाया होय. "परमेश्वरी उपासना" हेहि रोगमुक्तीकरितां महत्त्वाचे साधन आहे. विविध रोगाचे जंतु अन्न, पाणी व हवा यांच्याद्वारे माणसाच्या शरीरांत प्रवेश करतात. शरीरातील विद्युतशक्ति घटते. व रोगजंतूचा प्रभाव व शरीरावर पडून प्लेग, कॉलरा, क्षय इ. रोग होतात. दुसरे म्हणजे निरनिराळ्या कारणामुळे मनुष्याची मज्जातंतूसंस्था दुर्बल होते. मज्जातंतू संस्थे-द्वाराच शरीरांतील हृदय, फुफुसे, यकृत इ. इंद्रियांना विद्युतशक्तीचा पुरवठा होत रहातो. मज्जातंतू दुर्बल झाल्याने इंद्रियांना विद्युतशक्तिचा पुरवठा चांगल्या प्रकारे होत नाही. व इंद्रियांचे काम मंदगतीने चालू रहाते. त्यामुळे हृदय दुर्बल होणे, पचनशक्ती मंदावते इ. नाना रोग होतात. प्रत्यक्ष कोणताही रोग झाला नसतांना मला सर्व रोग झाले आहेत ही भावना होणे, हा एक विलक्षण रोग आहे. हा रोग मज्जातंतूच्या दुर्बलतेमुळेच होतो. त्यामुळे मन अस्वस्थ होऊन सतत भिती वाटते. कससच होतंय असे रोगी म्हणू लागतो. यासाठी परमेश्वरी उपासना हाच ह्यावर रामबाण उपाय आहे. म्हणूनच रामदासहि म्हणतात, **"उपासनेला दृढ चालवावे"** उपासनेमुळे मनाचे सामर्थ्य वाढून, मानसिक दुर्बलता नाहीशी होऊन मनावर पडणारा ताण सहन करण्याचे मानसिक सामर्थ्य येते.

## ।। प्रार्थनेचे सामर्थ्य ।।

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जर्मनीच्या प्रचंड रेट्यामुळे रशियन लोकांचा टिकाव लागेना. अनेक लोक मनस्वी भांबावून गेले. 'चर्चमध्ये जावून प्रार्थना करण्याची आम्हाला परवानगी द्या' असे स्टालिनला त्याचे सैनिक सांगू लागले,. नास्तिक स्टालिनने प्रसंग ओळखून सैनिकांना तशी परवानगी दिली. यावरून प्रार्थनेचे, उपासनेचे मानवी मनावरील सामर्थ्य ध्यानी घ्यावे. **"प्रार्थनेच्या योगे निर्माण होणाऱ्या सामर्थ्याचा मला आधार नसता तर मी वेडा झालो असतो"** असे महात्मा गांधीजींनी एका लेखांत स्पष्ट केलेले आहे माणूस प्रेमपूर्ण अंतःकरणाने प्रार्थना करु लागला म्हणजे त्याच्या अंगातील विद्युतशक्ति वाढते व प्रार्थनेच्या योगे रोग बरे होतात असे अमेरिकेतील ख्यातनाम डॉक्टर अलेकसिस कॅरेल यांचे म्हणणे आहे. शरीरशास्त्राच्या संशोधनाबद्दल त्यांना नोबेल पारितोषिक मिळालेले आहे. "प्रार्थनेच्या योगे माणसाच्या अंगांत शक्ती निर्माण होते. पृथ्वीची गुरुत्वाकर्षण शक्ति जशी खरी आहे, तशीच प्रार्थनेने निर्माण होणारी शक्ती सुद्धा खरीच आहे. इतर औषधी उपाय हरल्यानंतर प्रार्थनेच्या योगे शारीरिक व मानसिक रोग बरे झालेले आहेत. जेंव्हा माणूस प्रार्थना करतो तेंव्हा त्याचा चराचर विश्वांत भरून राहिलेल्या विश्वशक्तिशी संबंध जुळतो." डॉ. अलेक्सिस कॅरेलर सारख्या अधिकारी शरीरशास्त्राचे त्याच्या स्वानुभवावरुन बनलेले हे मत नास्तिकांना सुद्धा विचार करावयास लावणारे आहे. इग्लंडमधील दवाखान्यातून डॉक्टरांच्या बरोबर मिशनऱ्यांची सुद्धा नेमणूक केली जात आहे. व हे मिशनरी रोग्यांना प्रार्थना करण्यास सांगत असतात.

## ।। उपासनेचा परिणाम ।।

**नामजप आणि प्रार्थना हे उपासनेचे दोन महत्त्वाचे प्रकार आहेत.** माणूस एकाग्रचित्ताने जप करु लागला किंवा प्रेमपूर्ण मनाने प्रार्थना करु लागला म्हणजे त्याच्या अंगांतील विद्युतशक्ति वाढते. या वाढलेल्या विद्युतशक्तिमुळे मज्जातंतू संस्था बळवान होते व या विद्युतशक्तिच्या पुरवठ्यामुळे शरिरातील अंतरइंद्रियांची कार्यक्षमता वाढून माणसाची रोगप्रतिकारक शक्ति वाढते. या वाढलेल्या प्रतिकार शक्तिमुळे रोगजंतू नष्ट होतात व रोगनिवारण होते. उपासनेचा परिणाम आधी मनावर, मनाचा मज्जातंतूवर व त्याच्या द्वारा शरीरावर पडतो. उपासना व रोगनिवारण यांचा असा कार्यकारण संबंध आहे. विशेषतः मानसिक रोगावर उपासनेचा फारच चांगला परिणाम होतो. उपासनेमुळे मनाची प्रसन्नता शांति व निर्भयता वाढते. उपासकाचा आत्मविश्वासहि वृद्धिंगत होतो. **"समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे।"**

ह्या समर्थांच्या वचनाची प्रचिती येते. उपासनेमुळे रोगनिवारण कसे होते याबाबत श्री भिडे शास्त्रीजींनी दोन खरे अनुभव दिले आहेत. त्याच्या चिंतनांतून भाविकांनी बोध घ्यावा व प्रखर उपासना करावी.

मित्राच्या बहिणीला पाठीच्या कण्याचा क्षय झाला होता. ३/४ वर्षे डॉक्टरी उपाय करुनहि विशेष फरक पडत नव्हता. योगायोगाने इंदूरकडील स्वामी अच्युतानंद तीर्थ यांनी रामनामाच्या किंवा इष्ट-देवतेचा जप करण्यास तिला सांगितले जप करीत असतांना एका पातळ बाटलीत साखर टाकून ती हातांत घेऊन जप/ध्यान करण्यास सांगितले होते. त्यामुळे जप करीत असतांना अंगांतील वाढलेली विद्युतशक्ति बोटांच्या द्वारा बाटलीत जाते व ती साखर विद्युतसंचारित होते व तिच्यात औषधी गुणधर्म निर्माण होतात. दिवसांतून शक्य त्या-त्या वेळी जप करून रात्री निजतांना जप व प्रार्थना करून ती साखर खाण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे श्रद्धापूर्वक सहा महिने जप केल्यानंतर त्या मुलीच्या पाठीच्या कण्याचे दुखणे कायमचे बरे झाले. हा प्रयोग विविध व्याधींनी ग्रस्त झालेल्या रोग्यांनी अवश्य करुन व्याधीमुक्त व्हावे असे शास्त्रीजी म्हणतात.

एक मित्राला न्युरोस्थोतिया झाला होता. न्युरोस्थितिया हा मानसिक दुर्बलतेचा रोग आहे. निरनिराळ्या वेळी वेगवेगळ्या रोगांच्या त्याला भावना होत. त्याला ह्रदयरोग झाल्यासारखे वाटे, झोप त्यामुळे लागत नव्हती. आत्मविश्वास जावून आत्महत्या करण्याचे विचार त्याच्या मनांत येत असत. सर्व अंतरइंद्रिये ठिक असल्याने भिण्याचे कारण नाही असे डॉक्टर म्हणत. तो क्षणांत अस्वस्थ व्हायचा. ॲलोपॅथी, होमियोपॅथीच्या औषधानेहि गुण येत नव्हता. शास्त्रीजींनी त्याला सांगितले की, ज्यावेळी छातीत धडधड होऊन तुला अस्वस्थ होऊन भिती वाटेल त्यावेळी रामाला विश्वासाने हाक मार व करुणाष्टके प्रेमाने म्हण. रामनामाचा एकाग्रचित्ताने जप कर, तुझी अस्वस्था, धडधडणे, सारे निश्चित बरे होईल त्याने विश्वासाने, निष्ठापूर्वक रामोपासना (जप- प्रार्थना) केल्यावर २/३ महिन्यांत तो खडखडीत बरा झाला. अस्वस्थता, भिती गेली. अशारितीने मनाला प्रसन्नता, स्थिरता, शांती देऊन मानसिक रोगहि बरे करणारे राम-नाम हे अजब, प्रभावी रामबाण-औषध आहे!

## ।। रामनामातील अग्नीबीज ।।

रामनाम हा शब्द सर्वव्यापी व सर्वान्तर्यामी परमेश्वराचा प्रतिक आहे. त्याऐवजी श्रीकृष्ण, दत्त इ. आपल्या आवडीच्या कोणत्याहि नामाचा जप व त्या इष्ट देवतेची प्रार्थना करण्यास हरकत नाही. परमेश्वर एकच आहे. त्याला कोणत्याहि नावाने हाक मारा. उपासना शास्त्राच्या दृष्टीने परमेश्वराच्या सर्वच नामाचे जरी सारखेच महत्त्व असले तरी मंत्रशास्त्राच्या दृष्टीने "राम" या शब्दाला विशेष महत्व आहे. राम या शब्दांत 'र' कार आहे व 'र' काराला अग्नीबीज असे मंत्रशास्त्रांत समजतात. 'र' काराच्या उच्चाराने आपल्या शरीरांत विद्युतशक्तिचे तरंग जास्त प्रमाणांत सुरु होतात. व त्यामुळे रामनामाच्या उच्चाराने शरीरांत विद्युतप्रवाह जास्त जोराने सुरु होतो. हे रामनामाचे इतर देवतांच्या नामापेक्षां आगळे वैशिष्ट्य आहे.

उपासकाने एक अत्यंत महत्त्वाची सूचना लक्षांत ठेवावी. "एको देव: केशवो वा शिवो वा" हे सूत्र ध्यानांत ठेवावे. कांही दिवस रामाजी उपासना करावयाची. नंतर ती सोडून देवीची सुरु करावयाची वा दत्तोपासना करावयाची असे करतां उपयोगी नाही. सर्व देवता सारख्याच एकाच परमेश्वरी शक्तीची ही नावे असल्यामुळे एका देवतेच्यापेक्षां दुसरी देवता जास्त लवकर प्रसन्न होते अशा कल्पना पसरल्या असून त्या बरोबर नाहीत. म्हणून उपासकाने कोणत्या तरी एकाच देवतेच्या उपासनेला दृढ धरावे. त्याने चित्ताच्या एकाग्रतेला मदत होईल.

रामोपासना करीत असता आरोग्यकरितां नैसर्गिक नियमाला अनुसरुन आहारविहार ठेवले पाहिजेत. उपासना करणाऱ्यांनी **"ज्याने विठ्ठल मात्रा घ्यावी तेणे पथ्ये सांभाळावी"** ही तुकारामाची उक्ती ध्यानांत ठेवावी. रोगनिवारणाकरिता औषध घेत असतांना जसे पथ्य पाळणे आवश्यक आहे. तसेच उपासना करीत असतांना, अध्यात्मिक पथ्येहि सांभाळणे आवश्यक आहे. रामोपासना करीत असतांना, आपली सर्व कर्मे परमेश्वरार्पण बुद्धिने करावी व आपल्या सभोवतालच्या लोकांशी वागतांना आत्मैपम्यबद्धिने वागावे. **"आपणासारिखे दुसऱ्याला लेखित जाणे"** ही रामदासांची उक्ती मार्गदर्शक म्हणून समजावी. इकडे रामोपासना करावयाची व तिकडे काळाबाजार करून किंवा अन्य मार्गाने लोकांना फसवायचे

हे अयोग्य आहे. अशा अनैतिक वागणयाने उपासनेचा पूर्ण फायदा पदरांत पडत नाही. कारण 'राम' हा सर्वातर्यामी असल्यामुळे कोणालाहि फसविणे दु:ख देणे किंवा दुसऱ्याच्या द्वेष करणे म्हणजे त्या विश्वव्यापी रामालाच फसविल्यासारखे व त्याचाच द्वेष करण्यासारखे आहे.

**उपासनेला दृढ चालवावे**
**भूदेव-संतासी सदा नमावे**
**सत्कर्मयोगे वय घालवावे**
**सर्वांमुखी मंगल बोलवावे।।**

रामदासांच्या या दिव्य संदेशाला अनुसरुन जीवनात वागण्याचा प्रयत्न करण्याने सुखसमृद्धि आणि शांती यांचा लाभ होईल.

*।। श्री राम ।।*

■ ■ ■

## आले साईनाथ मनी

फुलला वसंत बहार जे अंगणी
आले साईनाथ आज माझ्या मनी
जीवन माझे हे अति अवगुणी
घ्या साईनाथ आता मज तारूनी
फुलला वसंत बहार

पेलले कष्ट जीवनाचे, अंतरी ठेवूनी तुजला
श्री साईनाथ- हा सतत ध्यास मजला
फुलला वसंत बहार

नाही मजला सुख, धन आणि मोक्षाची आस
श्री साई नाथ तुझ्या भक्तिचा असो मनी वास

**— मनोज कुलकर्णी**

## साईबाबांच्या शिर्डीत

**साईबाबांच्या शिर्डीत**
**मी हरवलो गर्दीत**
**हात घेऊनी हातात**
**धुंद साई गीत गात।**
**संसारात या गुंतलो**
**साई तुला विसरलो**
**विषयात मन दंग**
**कसा होऊ रे नि:संग?**
**माझे मीपण जपले**
**आजु बाजु ना पाहिले**
**तुझी शिकवण बाबा**
**पोथीतच राहिली बा।**
**अन्यन्य भाव शरण**
**एक झाले तन-मन**
**तव पायी दे आसरा**
**दीन पतित पामरा।**

**— सुधाकर ठाकुर**

## देव माणसाची पावले

देव माणसाची पाऊले
न कळत, कधी एखाद्या
भूमीला लागतात
त्या भूमीच्या भाळी
अलौकिकत्वाचा टिळा लागतो
शिर्डीने धारण केलेले
हे अलौकिकत्व
कधाही न पुसले जाणारे
कुणीही न हिरावून घेणारे
एक अमर काव्य
ज्यात जातीयता हे विशेषण
गरीब श्रीमंत ही सामान्य नामे
उच्चनीचतेचे छंद लोप पावतात
आणि करते ते महाकाव्य
दृष्टांन्तानी भरलेले
अलंकारांनी सजलेले
अनुपमेय भक्तिरसाचे
एक अमर काव्य
हा काव्य दिप
भक्तांच्या अंत:करणातील
कर्ता कर्म क्रियापद
विकसित करतो
कर्ता सत् क्रियेस प्रवृत्त होतो
क्रिया संपन्न झाल्यास
जीवन प्रकाशित करुन
समृद्ध करतो

**— सौ. शकुंतला शं. जगतकर**

# संत साहित्याचा अभ्यास कशासाठी ?

***संत साहित्याचा अभ्यास कशासाठी? हा प्रश्न अनेकजण अनेकवेळा विचारतात. या प्रश्नाचे डॉ. इनामदारांनी समर्पक उत्तर दिले असून संत साहित्याच्या अभ्यासाच्या नव्या दिशांचेही दिग्दर्शन केलेले आहे. अभ्यासू-जिज्ञासू भक्तांसाठी एक मार्गदर्शन —***

संत साहित्याचा अभ्यास कां करायचा? उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीनं याचं उत्तर उघड आहे. ते म्हणतील, "संत साहित्य समजायला अवघड असलं, तरी या प्रश्नाचं उत्तर सोपं आहे. हा अभ्यास परीक्षेसाठी करावा लागतो. बी. ए. ला ज्ञानेश्वरीचा एखादा अध्याय नेमलेला असतो. एम. ए. ला प्राचीन ग्रंथकार म्हणून संत तुकाराम किंवा संत नामदेव यांच्यावर एक संपूर्ण प्रश्नपत्रिका असते. परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी संत साहित्याचा अभ्यास करावाच लागतो."

विद्यापीठीय परीक्षेसाठी संत साहित्याचा अभ्यास हे व्यावहारिक प्रयोजन झालं. पण स्वत: संतांच्या दृष्टीनं आत्म-परीक्षा हे त्यांच्या साहित्य-निर्मितीचं प्रधान प्रयोजन असतं.

**'तुका म्हणे मना पाहिजे अंकुश।**
**नित्य नवा दिस जागृतीचा।'**

अशी संतांची साक्ष आहे. बोली अरूपाचं रूप दाखविण्यासाठी ज्ञानेश्वरीचं लेखन झालं आहे. कीर्तन रंगात नाचून जगात ज्ञानदीप लावण्यासाठी नामदेवांनी अभंग रचना केली आहे. ब्रह्मांड भेदून रामकथा पैलाड न्यावी म्हणून रामदासांचं काव्य अवतरलं आहे. 'सेवितो हा रस, वाहितो आणिका।' ब्रह्मरस सर्वांना सेवन करता यावा, यासाठी तुकयाची प्रसिद्ध अभंग वाणी सदैव सिद्ध आहे. संतांच्या दृष्टीनं त्यांचं साहित्य जसं 'स्वान्त सुखाय' आहे, तसंच ते 'बहुजन हिताय' देखील आहे.

पदवी परीक्षे पेक्षाही अधिक व्यापक भूमिकेवरून संत साहित्याकडं वळणारा एक वर्ग आहे. हा वर्ग आहे संशोधकांचा, किंवा समीक्षकांचा. पाठचिकित्सा, भाषिक विशेष, तत्त्वदर्शन, समाजचिंतन, परमार्थ विचार आणि वाङ्मयीन वैभव अशा विविध अंगानी संशोधक आणि समीक्षक संत साहित्याचा अभ्यास करतात.

राजवाडे, कोलते, ढेरे अशा मात्तबर संशोधकांनी संतसाहित्याची संहिता निश्चिती करण्याचे वस्तुपाठ उभे केले आहेत. भावे, पांगारकर, आजगावकर प्रभृती लेखकांनी या साहित्याचा इतिहास सादर केला आहे. पेंडसे, खुपरेकर, बहिरट अशा पंडितांनी संतसाहित्यातील तत्त्वचिंतनाचा उलगडा केला आहे. न्या. रानडे, माटे, सरदार अशा विचारवंतांनी संत साहित्याची सामाजिक फुलश्रुती शोधली आहे. वा. ब. पटवर्धन, मा. गो. देशमुख, रा. शं. वाळिंबे प्रभृतींनी संत साहित्यातील विदग्ध रसवृत्तीचा परामर्श घेतला आहे.

**डॉ. हे. वि. इनामदार**
अध्यक्ष, गीताधर्म मंडळ, पुणे

आणखी एका वेगळ्या अंगानं संत साहित्याच्या अभ्यासाकडं वळण्याची गरज आहे. या अभ्यासातून ललित कलाकृत्तीची निर्मिती करता येईल. एखाद्या कलाकृतीला काळाचा आत्मा गवसला, तर ती यशाच्या शिखरावर पोहोचते. 'स्वामी' व 'पानिपत' ही अलीकडची उदाहरणं होत. 'संत ज्ञानेश्वर' व 'संत तुकाराम' हे प्रभातचे चित्रपट त्या संतांच्या व्यक्तित्वाच्या व कवित्वाच्या परिणत अभ्यासातून सिद्ध झाले आहेत. 'धर्मात्मा' (संत एकनाथ) त्या उंचीवर पोहोचला नाही. 'भगवद्गीता' हा ग्रंथ किंवा संत बहिणाबाईंचं. जीवन व काव्य ही अभ्यासकांपुढील आव्हानं आहेत. कथाकाव्य, चित्रपट किंवा कादंबरी यापैकी कोणताही कलाप्रकार त्यांच्या अभ्यासातून सिद्ध होऊ शकेल. ही अभ्यासभूमी नांगरल्याविण पडून आहेत. सनदी शेतकऱ्यांनी तिचा वेध घेतला पाहिजे!

■ ■ ■

# संत नामदेवाचे हिंदी भक्तीकाव्य

प्रा. डॉ. अशोक कामत.
*(प्रमुख, संत नामदेव अध्यासन पुणे विद्यापीठ)*



***महाराष्ट्राचे संत नामदेव हे एक जेष्ठ आणि श्रेष्ठ हिंदी कवी रचनाकार आहेतच, पण ते हिंदी संतमत अथवा समाजमनस्क विचारधारेचे प्रमुख अधिकारी आहेत. त्यांची मराठी मिश्रित हिंदी रचना "मुखबानी" म्हणून सिखबांधवांच्या श्रीगुरुग्रंथसाहेबात समाविष्ट आहे.***
***उत्तरेतील कबीरादासादी संत आणि सिखपरंपरेतील गुरु, भगत, आणि पंथानुयायी त्यांना आदरपूर्वक मानीत, म्हणूनच आजही पंजाबात त्यांचा प्रभाव दिसत आहे. नामदेवरायांचे उपलब्ध हिंदी काव्य जरी अल्प असले तरी त्यांचे हिंदी प्रदेशातील कार्य मोठे आहे. त्यामुळे अधिक महत्त्वाचे ठरते. आचार विचार आणि उच्चाराचे असे ऐक्य अन्यत्र क्वचितच दाखविता येईल.***

## नामदेववाणीची वैशिष्ट्ये

महाराष्ट्र भाषा मराठीच्या आरंभापासूनच आपल्याकडे व्यापक जनभाषा हिंदी ही अभिव्यक्तीसाठी स्वीकारली गेली. इथे आदिकाळ अथवा यादव कालापासूनच हिंदी काव्य रचना करण्यात आली आहे. त्यामुळे आपल्याकडे या दोन्ही मराठी-हिंदी भाषा कांव्यांचे प्रवाह एकमेकांत मिसळून गेले आहेत. अशा प्रकारचे वैशिष्टे कदाचित अन्यत्र आढळून येत नाहीत. या दृष्टीने महाराष्ट्र हा दक्षिण आणि उत्तर भारतीय भाषा भगिनी आणि काव्यातील सेतूबंध ठरतो. इथे हिंदीचा इतका व्यापक स्वीकार व प्रसार झाला याची कारणमीमासां आम्ही अन्यत्र विस्ताराने केलेली आहेत. (पाहा! आद्य महाराष्ट्रीय हिंदी कवी आचार्य दामोदर पंडित और उनकी कविता. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे/१९७६)

यादवकालीन ज्ञानदेवांची सातत्याने पाठराखण करणारे श्रेष्ठ अभंगगायक कीर्तनकार संत नामदेव इत्यादि हे समाजमनस्क वृत्तीचे आद्य यात्री संत होते. त्यांचे हिंदी काव्य ज्या पोथ्या-हस्तलिखीतातून मिळते. त्यामधून उत्तर भारतीय संत भक्तांची कवनेही उपलब्ध होतात. कबीरदास, रबिदास, रज्जबदास दादूदास, गरीबदास, खेमदास अशा हिंदी संत मताच्या अनेक कवी रचनाकारांच्या वाणीबरोबरच नामदेवांची हिंदी पदे उत्तरेतही आढळतात. हे सारे ध्यानी घेतल्यावर नामदेवांच्या हिंदी पदावलीची सर्वदूर प्रसृत असणारी लोकप्रियता आपल्या ध्यानी येते. मराठी प्रदेशाबरोबरच उत्तर भारतांच्या विस्तृत भूभागात ही रचना मिळावी याचे महत्त्व विशेष आहे.

नामदेववाणीची हस्तलिखिते उत्तर भारतातील बाडांतून असावीत आणि महाराष्ट्रात व उत्तरेत एकाच वेळी ती मिळावीत आणि ती सारखीच महत्त्वाची असल्याची ग्वाही हिंदी अभ्यासकांनीही द्यावी हे अत्यंत अर्थपूर्ण होय!

यावरुन उत्तरेत गाजणाऱ्या हिंदी रचनांचे कर्ते संतनामदेव हे महाराष्ट्रातील प्रख्यात संत नामदेवच होते, हे सिद्ध होते. खरे तर नामदेवांच्या उत्तर यात्रेची परंपरेने कृतज्ञतापूर्वक जतन केलेली ही एक अतिशय मोठी साक्षच मानायला हवी. पण अनेक मराठी अभ्यासक या वाङमयाकडे पुरेसे लक्ष देत नाहीत असे दिसते.

नामदेवांची उत्तरेकडील पहिली तीर्थयात्रा ज्ञानदेवादी संत मेळासह झाली. असे तीर्थावळीच्या अभंगावरुन म्हणता येते. त्यावेळी त्यांनी उत्तरेतील सत्पुरुषांच्या भेटी घेऊन आपले विचार हिंदीतून व्यक्त केले असल्याची शक्यता आहे.

इ. स. १२९६ मध्ये ज्ञानदेवांनी आळंदीला संजीवनी समाधी ग्रहण केली पाठोपाठ संत मेळा ही गेला. नामदेवराय एकाकी राहिले. त्याआधी दोन वर्षे अल्लाउद्दीनने देवगिरीवर घाला घातला. यादव समाज्र बुडायला लागले. धार्मिक परचक्र उत्तरे प्रमाणेच मराठी प्रदेशावरही आले. इस्लामी संस्कृतीचे आक्रमण हे संकट मोठे होते. आधीच आपापसातील भेदाभेदांनी हिंदू समाज पोखरला होता. अशा विपरित काळात नामदेवांनी जनजागरणाकरीता देशाटन केले. मराठी बरोबरच हिंदीतून पद रचना करुन सर्वांना संन्मार्ग दाखविण्याचा यत्न केला.

संत नामदेवांच्या सांप्रदायिक गाथांपैकी आवटे प्रतीमध्ये १०२ हिंदीपदे संकलित आहेत. आवटे यांच्या पूर्वीच्या शं. पु. जोशी यांनी नामदेवांची सिख आदीग्रथांत समाविष्ट पदे सार्थ स्वरुपात सर्वांसमोर ठेवली होती. हैद्राबादचे श्रीराम शर्मा यांनी ही दख्खिनी हिंदीच्या विवेचना सोबत नामदेवरचित ४२ हिंदी पदे दिली होती. पं. विनयमोहन शर्मा यांनी मराठी संतांनी हिंदीला नेमके कोणते योगदान दिले याचा सविस्तर परमार्श घेऊन त्यांची हिंदी वाणी पुन्हा एकदा सर्वांपुढे ठेवली. यामुळे हिंदी विद्वानांचे लक्ष या ठेव्याकडे वेधले गेले.

१९६४ मध्ये डॉ. भगीरथमिश्र / रामनारायण मौर्य यांनी संयुक्तपणे नामदेवांच्या हिंदी पदावलीचे संपादन पुणे विद्यापीठामार्फत केले. त्यात पाठभेदनोंदीसह २३० पदे आणि १३ साख्या दिल्या आहेत. पण संपादकांनी जो विशिष्ट पाठ स्विकारला तो मात्र जुनाच आहे, असे नाही.

नामदेव समाजाचे एक अभ्यासक माधवराव बारटक्के यांनी वैयक्तिक प्रयत्नातून एकत्र केलेली एकूण २०४ पदे आणि १३ साख्या श्री नामदेव प्रकाशन समिती ने प्रकाशित केल्या. अलिकडे नामदेव जन्मसप्त शताब्दीचे निमित्त साधून कृ. गो. बानखडे गुरुजींनी याबाबतचे फार मोठे कार्य केले. त्यांनी मिश्र-मौर्य पदावली पेक्षा अधिक पदे दिलेली आहेत. त्यांचा पाठ अधिक विश्वसनीयही वाटतो. या सर्व प्रकारात संत नामदेवकृत हिंदी पदावलीची सविस्तर चर्चा आम्ही 'प्रसाद' या संतसाहित्यास वाहिलेल्या नियतकालिकात केलेली आहे. एकतर वानखडांनी राजस्थानातील गावोगावी भ्रमण केले. आणि मौखिक परम्परेने तेथे सुरु असलेली पदे एकत्रित केली.

## 'मुखबानी'

ज्या ज्या देशा जाती तीर्था। तैसीच तेथे करिती कविता। अशा शब्दांत महिपती बुवा ताहराबादकर यांनी नामदेव प्रशंसा केली ती यथार्थ म्हणता येईल.

नामदेव चरित्रात अनेक चमत्कार सांगितले जातात. त्यांच्या हातून भगवंताने नैवेद्य स्वीकारला. भोजन केले, त्यांचे घर शाकारुन दिले, मेलेली गाय त्यांनी जिवंत केली, त्यांच्यासाठी देवालय फिरले; खोलवर विहिरीत शिरुन त्यांनी भक्तीसामर्थ्याने पाणी वर काढले. अशा प्रकारचे चमत्कार खरे की खोटे यावर वादही घातला जाऊ शकतो. विज्ञानयुगात हे सारे खरे मानले जाईल अशी अपेक्षा करु नये. शिवाय इतरही संतांच्या जीवन चरित्रात अशाच तऱ्हेचे कितीतरी चमत्कार सांगण्यात येतात. हिंदी भाषेवरील त्यांचा अधिकार! भावभक्ती आणि उदार विचार यांनी ओथंबलेली त्यांची मराठी अभंग संपदा तर आहेच पण उत्तरेतील साऱ्या संत मंडळीला प्रेरक ठरावी अशा हिंदीतही त्यांची रचना आहे. गुरुनानकदेवांच्या पूर्वी दोन शतके झालेले एक जनमान्य तत्त्वज्ञ कवी म्हणून त्यांना सिख गुरुंनी पाहिले. आजही त्यांना सिख बांधव आणि समाज सन्मानपूर्वक स्मरण करतात. याचे कारण त्यांची गुरुग्रंथात समाविष्ट **मुखबानी!**

या शब्दाचा वापर केवळ नामदेवरायांच्या बाबतीत का बरे होतो? मुखबानी म्हणणे मौखिक परंपरेने आलेली काव्यरचना असा अर्थ सांगतात. असे असते तर सर्वच संतांची कविता मुखबानीच म्हटली पाहिजे. असे होत नाही त्यामुळे मुखबानीचा अर्थ इतकाच नाही हे उघड होते.

मुखबानीत नामदेवांची ६१ निवडक हिंदी पदे आहेत. ती त्यांच्या उपलब्ध एकूण हिंदी पदावलीचे सार ठरतात. ती गुरुग्रंथात सर्वत्र विखुरलेली आहेत. म्हणजे ग्रंथकर्त्यास ती बरीच महत्त्वाची वाटली हे स्पष्ट आहे.

मुखबानीत गेवेदू, कांबळी, बापुडा, सखे, असे मराठी शब्द ओळीगणीक येतात. क्रियापदरुपे, विभक्तीरुपे सर्वनामरुपे आढळतात. अनेकानी यापूर्वी अशा शब्दांची यादीच सादर केलेली आहे. (१९७० मध्ये प्रकाशीत 'संत नामदेव दर्शन' वृद्ध ग्रंथामध्ये मांडली. 'संत नामदेवांच्या मराठी-हिंदी काव्यातील समरुपता' हा लेख लिहून या संदर्भातील अनेक वादावर कायमचा पडलेला आहे. जिज्ञासूनी तो लेख पाहावा.)

गुरुग्रंथाचे संकलन-संपादन १६०६ मध्ये पुरे झाले. ते पंचमगुरु अर्जुनदेवांनी केले म्हणजे मुखबानी कमीतकमी चार शतके इतके प्राचिन आहे. ती नामदेवांची आज उपलब्ध जुन्यात जुनी पदे म्हणता येतील.

या पदात भागवत धर्मांचे समन्वयाचे तत्त्वज्ञान, जातीय निरपेक्ष दृष्टी, गुरुकृपा, नामभक्तीचे महत्त्व सहज समाधीचा आनंद आणि अद्वैत भक्तीचे मर्म असे विषय येतात. हेच पुढे कबीरदास रविदास,पलटू दास, इत्यादी हिंदी संतकविच्या रचनेत दिसतात. ज्ञानदेवांनी मांडलेला अद्वैतभक्तीचा सिद्धांत संत नामदेवांनी आपल्या अभंग-पदांच्या माध्यमातून मराठी-हिंदीतून अधिक विस्तृत सांगितला.

कर्त्याच्या चरित्रविशेषांचे उल्लेख, गुरुं विसोबानाथांचा उल्लेख पौराणिक कथांचे निर्देश, उपास्य श्री विठ्ठल समाप्तीमुद्रा इत्यादींचे मराठी-हिंदी रचनेचे एकरुपत्व सुस्पष्ट आहे. प्रत्येक ओळी गणीक मराठी शब्दही मिळतात. 'ते' या खास मराठी प्रत्ययाचा खडी बोली हिंदीतील प्रादुर्भाव नामदेवांनाही झाला असे सिद्ध करता येते यादवकालीन मराठीचे उकार बाहुल्याही या हिंदी वाणीत सर्रास आढळते.

## ।। नामदेवाचे सामाजिक प्रबोधन ।।

आदिकालीन हिंदी वाङमयाचा इतिहासच मुळी नामदेवरायांच्या निर्देशांशिवाय सांगता येत नाही. गोरक्षनाथादी नाथसिद्धांच्या काळातील संध्यामाळा / खिचडी आणि पुढे दक्षिणेतील मुसलमानी सत्तेच्या आरंभापासून आलेल्या दक्षिणी हिंदीचा वारसा महाराष्ट्रातच नामदेवांना लाभला आणि ते उत्तरेकडे गेले. त्या वेळी सहजतेने हिंदी रचना करु शकले. आम्ही हे अन्य उदाहरणे देऊन अन्यत्र स्पष्ट केले आहे. नामदेवांच्या हिंदी रचनेतील आत्मपर उल्लेख समाजचित्रेही तपशीलवार पाहण्यासारखी आहे. नामदेवांच्या या रचनेचा सर्वात मोठा आणि ठळक विशेष म्हणजे सामाजिक प्रबोधन. 'हीनडी मेरी जाती' असे ते खेदाने म्हणून आपल्यावर गुदरलेल्या विचित्र प्रसंगाचे निवेदन करतात. तर कधी ' कहाँ करो जाति, कहाँ करो पाति। राम को नामु जप दीनराती।' असा निर्धार व्यक्त करतात. 'सुईनेकी सुई रुपेका धागा। नामेका चितु हरि सिऊ लागा' असा त्यांचा अनुपम आनंदोल्लास आहे.

उच्चनीचतेची भावना आजही उत्तरेत फार आहे. त्याकाळी तर बहुजन या भेदाभेदामुळे दबलेले होते. नामदेवरायांनी त्यांच्यात आत्मबळ जागवले आणि तथाकथित प्रतिष्ठितांना आत्मभान घडविले.

विश्वाची व्यापक आनंद स्थिती अनुभवली आणि इतरांच्या प्रत्ययासही ती प्रभावीपणे आणून दिली. 'गोविंद बीनू नही कोई।' असा विश्वतत्त्वाच्या सर्व व्यापकतेचा उद्घोष त्यांनी केला. हिंदूच्या श्रद्धास्थानाची मोडतोड होत होती, मूर्तीचे जाणीव पूर्वक भंजन होत होते. आणि करणारे स्वत: दिमाखाने बुतशिकन म्हणवून घेत होते. तिथे वावरुन नामदेवराय ठाम पणे म्हणाले :

**घटघट अंतरी सरब निरंतरी,**
**केवल एक मुरारी।।**

**ईभै बीठ्ठलु, ऊभै बीठ्ठलु।**
**बीठ्ठलु बिन संसारू नाही।।**

मूर्ती फुटतील/,जातील पण सत्वसंपन्न साधक भक्तभागवतांच्या मनोमंदिरातील श्रद्धा नाही तोडता मोडता येणार.

देवावीण ठाव रिता नाही. देव सदासर्वत्र विद्यमान आहे. त्याच्या साक्षीनेच विश्वाचे सारे व्यवहार सुरू आहेत. कोणी देव-मंदिराचा विध्वंस केल्याने देवकल्पना नष्ट होत नाही. ईश्वरतत्त्वाला बाधा येत नाही. हे सारे उत्तरेत जाऊन सांगण्याचे कार्य त्याकाळी नामदेवांनीच सर्वप्रथम केले. त्यानंतर उत्तरेत याप्रकारची विचारधाराच उगम पावली. संत नामदेव-संतकबीर आणि गुरूनानक देव अशी या संतदर्शनाची **त्रिवेणी** आहे.

■ ■ ■



***'श्री साईलीला' हे नियतकालिक श्री साईबाबा संस्थान शिरडीच्या वतीने गेली ७४ वर्षे प्रकाशित होत असून हिंदी इंग्रजी आणि मराठीत प्रसिद्ध होणाऱ्या या नियतकालिकाने पारमार्थिक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावलेली आहे, असे अनेक मान्यवरांचे मत आहे.***
***'श्री साईलीला' बाबतचे बोलके अभिप्राय***

# काही अभिप्राय

## श्रीसाईलीला बाबांचा आशिर्वादच!

मी सरकारी नोकर असून मला खरा भक्तीचा मार्ग श्री साईकृपेने सापडला आहे.

एका आजाराने मी पछाडलो होतो. त्यानंतर मी माझे मित्र आम्ही शिरडीला गेलो. भरल्या मनाने दर्शन घेतले. समाधीमंदिराच्या समोर बुक स्टॉलवर माझ्या मित्राने "श्री साईलीला" मासिकाची वर्गणी भरली. माझे लक्ष त्या पुस्तकावर गेले. मी वर्गणी भरुन सभासद झालो. पुस्तक घेऊन वाचायला सुरुवात केली. मला जणू मोठा खजिना सापडला. सदगुरु भेटावा असा अद्वितीय लाभ झाला. बाबांच्या भक्तीची ओढ वाढली. कधीही कुठलीही पोथी न वाचणारा, मी "श्री साईसत्चरित्र" पोथी विकत घेतली. तसेच कायम "श्री साईलीला" मासिकाचा सभासद झालो. माझ्या अनेक इच्छा "श्री साईलीला" ने फलद्रुप झाल्या. श्री साईलीला" तील धार्मिक, आध्यात्मिक अशा विविध उपयुक्त माहितीमुळे माझ्यातील धार्मिक भावना वाढीस लागली. माझा आजार पूर्णपणे पळाला.

"श्री साईलीला" मासिकावरील बाबांचा स्मितहास्याचा फोटो पाहिल्यावर मन फार आनंदीत होते. ज्यांना पुस्तके वाचनाची आवड आहे त्यांना मी श्री साईचा आशिर्वाद म्हणून 'श्री साईलीला' देतो.

**दिलीप सावंत** (खोपोली)

## अंक वेळेवर निघावेत

'श्री साईलीला'चे अंक गेले वर्षभर फारच अनियमित निघत आहेत याचा खेद वाटतो. खूप दिवसानंतर हाती आलेला 'पुण्यतिथी विशेषांक' पाहून आनंद झाला. त्यातील संपादकाचे निवेदन वाचून यापुढे श्री साईलीला नियमित प्रकाशित होणार याचे खूप समाधान वाटले. संस्थानच्या कार्यात अडचणी येणारच पण त्यावर मात करुन आपण श्री साईलीला प्रकाशनाच्या नियमिततेला अधिक प्राधान्य द्यावे असे वाटते. पुण्यतिथी विशेषांक व मे-जूनचा अंक दोन्ही आवडले वाचनिय व संग्राह्य वाटले. विशेषत: पुण्यतिथी अंकाची मांडणी (लेआऊट) खूपच आवडला. असेच संग्राह्य-वाचनीय अंक काढा. माझ्या शुभेच्छा.

— **सु. ह. जोशी** (पुणे)

# लेखक-कवी आणि भक्तांना नम्र निवेदन

लेखक-कवी आणि भक्तांनी आपले लेख-कविता-अनुभव 'श्री साईलीला'साठी जरूर पाठवावेत. त्यांचे सहर्ष स्वागतच आम्ही करू. परंतु ते साहित्य पाठविताना खालील सूचनांचे पालन करावे ही विनंती—

★ लेख-कविता या आध्यात्मिकपारमार्थिक विषयावरच असणे आवश्यक आहे. सामाजिक विषयाचा उद्देश उद्‌बोधक व समाजहितैषी असेल तरच त्याचा विचार होईल.

★ लेख-कविता-अनुभव हे कागदाच्या एकाच बाजूस पुरेसा समास सोडून लिहावेत. पाठपोट लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.

★ लेख-कविता-अनुभव यांची हस्तलिखित वा टंकलिखित मूळ प्रतच पाठवावी. झेरॉक्सप्रत पाठवू नये.

★ अनुभव कथनामध्ये ते श्री साईबाबांशी संबंधितच असावेत. तसेच ते इतरांना वाचण्यासारखे असावेत. अत्यंत खासगी स्वरूपाचे अनुभव पाठवू नयेत. अनुभव कथनाचे लेखन विज्ञानयुगाचे भान ठेवून केले जावे.

★ कोणतेही साहित्य आमच्याकडून पोस्टेजज खर्च करुन परत पाठविले जाणार नाही तरी आपल्या साहित्याची एक प्रत स्वतःकडे जरूर ठेवावी.

★ साहित्य मिळाल्याची पोच, ते मिळताच पाठविली जाते आणि योग्य मजकूर नजिकच्याच अंकात प्रसिद्ध केला जातो.

★ लेखासमवेत आवश्यक ते फोटोग्राफ-चित्रे जरूर पाठवावीत.

**संपादक**
**'श्री साईलीला'**


# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित फोटोंची यादी

| अनु-क्रमांक | फोटोचे नाव | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| २. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | पोष्टकार्ड | - |
| ३. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | २'' x ३'' | ०.२० |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| ५. | द्वारकामाई (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ६. | मूर्ती (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ८. | मूर्ती (४ रंगात) | ७'' x १४'' | ०.७० |
| ९. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ११. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.७० |
| १२. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०.३० |
| १३. | पालखी (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.७० |
| १४. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४'' x २०'' | २.१० |

सर्व फोटोंकरिता पॅकिंग व पोस्टेजचा दर रु. ९.०० आहे.

# श्री साईंच्या पादुका केवळ शिरडी येथेच !



आज-काल बाबांच्या नावावर असंख्य ठिकाणी पादुका दिसतात. या पादुका म्हणजे नुसत्या पादुकांच्या प्रतिमा असतात. त्या बाबांनी वापरल्या असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नसतो. तरीही त्या प्रतिमांच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात. हा त्या पादुकाप्रतिमांचा प्रभाव नसून सामान्य माणसाच्या मनातील बाबांविषयीच्या श्रद्धेचा प्रभाव असतो. श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाने एका ठरावाद्वारे सर्व भाविकांना सूचित केलेले आहे की, श्री साईबाबांनी वापरलेल्या प्रत्यक्ष पादुका शिरडी येथे समाधीमंदिरातच असून तशा पादुका अन्यत्र कुठेही नाहीत, याची भाविकांनी कृपया नोंद घ्यावी.

Registered with the Registrar
of News-papers of India
No. MH/527

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु-क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ४८.०० | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | २४.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २३.०० | १०.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | २२.०० | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २७.०० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २७.०० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ | ८.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ८.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ८.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ८.०० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० | ८.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ | ८.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ८.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० | ८.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० | ८.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - | ८.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० | ८.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - | ८.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० | ८.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ८.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० | ८.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ८.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - | ८.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ८.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ८.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | - | ८.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ८.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० | १०.०० |

ादक
सुकथनकर
ार्यकारी संपादक
ाधर ताठे

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे, अधिकृत नियतकालिक

# श्री साईलीला

श्री पुण्यतिथी विशेषांक

सप्टेंबर -
ऑक्टोबर १९९५
विजयादशमी
मूल्य रु. १२/-





श्री साईबाबांचे प्रत्यक्ष व दुर्मिळ छायाचित्र

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे,
अधिकृत नियतकालिक

# श्री साईलीला

वर्ष ७४ अंक ६ -७

सप्टेंबर - ऑक्टोबर १९९५
विजयादशमी - दसरा
**श्री पुण्यतिथी विशेषांक**

संपादन
*** द. म. सुकथनकर ***

कार्यकारी संपादक
*** विद्याधर ताठे ***

**मुद्रक**
**श्री ऑफसेट मुंबई**
**अक्षर जुळवणी**
आयकॉन सिस्टीम्स पुणे.

**कार्यालय**

'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई -४०० ०१४
दूरध्वनी : ४१२२५६१

वार्षिक वर्गणी - रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी - रु. १,०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी - रु. १,०००/-
(टपाल खर्चासहित)
विशेषांक किंमत रु. १२/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर , अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान शिरडी यांनी हे नियतकालिक , 'साईनिकेत', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०००१४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



# निवेदन

**द. म. सुकथनकर**

**सर्व मंगल मांगल्ये । शिवेसर्वार्थ साधिके ।**
**शरण्ये त्रिंबके गौरी । नारायणी नमस्तुते ।**

विजयादशमीच्या या मंगल दिनी श्री साईबाबा व आदिमाया आई जगदंबेचे पुण्यस्मरण करून 'श्री साईलीला' नियतकालिकाचा हा 'पुण्यतिथी विशेषांक' भक्तभाविकांच्या हाती देताना आम्हाला अपूर्व आनंद होत आहे. काही अपरिहार्य कारणांमुळे 'श्री साईलीला' प्रकाशनात निर्माण झालेल्या अडचणी श्री साईबाबांच्या कृपेने दूर झाल्या असून आता यापुढे हा अंक नियमित आपल्या हाती पडणार आहे याचेही एक समाधान हा अंक प्रसिद्ध करताना आम्हाला वाटत आहे. 'जानेवारी- फेब्रुवारी' व 'मार्च - एप्रिल' हे दोन अंक प्रसिद्ध झाले आहेत. 'मे-जून' व 'जूलै - ऑगस्ट' हे दोन अंक अद्यापी प्रकाशित व्हावयाचे आहेत याचे आम्हाला शल्य आहे. हे दोन अंक लवकरात लवकर वाचकांच्या हाती देण्याचा आमचा प्रयत्न असून 'नोव्हेंबर-डिसेंबर' च्या अंकापासून आपली विस्कटलेली घडी पूर्ववत सुरळीत होईल असे वाटते. श्री साईलीला प्रकाशनात आलेला अनियमितपणा साईभक्तांनी बाबांच्या संदेशाप्रमाणे 'सबुरी' दाखवून सहन केला त्याबद्दल साईभक्तांचे आम्ही आभारी आहोत.

ऑगस्ट महिन्यापासून 'श्री साईलीला' साठी कार्यकारी संपादक म्हणून संस्थानला अनुभवी पत्रकार व संतसाहित्याचे गाढे अभ्यासक श्री. विद्याधर ताठे लाभले आहेत. श्री ताठे यांना पत्रकारितेच्या क्षेत्रातील 'लोकहितवादी', 'डहाणूकर' आणि 'विक्रम' असे राज्यपातळीवरील काही पुरस्कार मिळालेले आहेत. संतसाहित्य विषय घेऊन त्यांनी एम. ए. केलेले असून पत्रकारितेच्या क्षेत्रातील पदव्युत्तर 'बॅचलर ऑफ जर्नालिझम व कम्युनिकेशन' पदवीही त्यांनी संपादन केलेली आहे. 'मनासज्जना', 'एक तरी ओवी अनुभवावी', 'स्मृती सौरभ' 'देवमाणूस', 'वास्तू प्रकाश' आदि ग्रंथांचे संपादन त्यांनी केलेले आहे. प्रस्तुत विशेषांकापासून त्यांनी आपल्या साईसेवेचा श्रीगणेशा केलेला आहे. त्यांच्या प्रयत्नांनी 'श्रीसाईलीला' एक अग्रगण्य अध्यात्मिक नियतकालिक व्हावे एवढी इच्छा व्यक्त करून या निवेदनास पूर्णविराम देतो. सर्वे जना: सुखिनो भवन्तु ।

द. म. सुकथनकर
मुख्य संपादक
**अध्यक्ष**
**श्री साईबाबा संस्थान शिरडी.**



या हो या हो अवघेजन । करा बाबासी वंदन ।।
– दासगणू

# श्री साईलीला

## श्री पुण्यतिथी विशेषांकाचे

## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | – | ३ |
| विश्वस्त मंडळाचे कार्य | – | ५ |
| नमस्काराष्टक | – | ७ |
| प्रार्थना | – | ८ |
| श्री साई सत्चरित: साईभक्तांची गीता ज्ञानेश्वरी | ले. कर्नल निंबाळकर | ९ |
| मंत्रपुष्पांजली | वेदमूर्ती स. कृ. देवधर | २९ |
| कांडण | डॉ. यु. म. पठाण | ३५ |
| वैष्णोदेवी : लक्ष्मी, काली, सरस्वतीचा समन्वय | विद्याधर ताठे | ३६ |
| साईभक्तीचे वर्म | म. द. जोशी | ३९ |
| पुण्यश्लोक अहल्यादेवीचे कार्यकर्तृत्त्व | एम एन कुल्लुर | ४१ |
| मानवधर्माचे पुण्यस्मरण | अशोक खांबेकर | ५० |
| दासगणुंची साईभक्ती | द. म. सुकथनकर | ५१ |
| संतसाहित्यातील नामस्मरण भक्ती | डॉ. हे. वि. इनामदार | ५४ |
| सामाजिक ऐक्याचे प्रवर्तक : संतकबीर | बी. व्ही. सावंत | ५८ |
| गुरू आणि सद्‌गुरू | चं. प. भिशीकर | ६० |
| ज्ञानदेवांचे दिव्य मागणे | भानूदास महाराज देगूलकर | ६३ |
| मुलाखत : अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान शिरडी | विद्याधर ताठे | ६७ |
| दत्तसंप्रदायी योगेश्वर | गजानन कुलकर्णी | ७२ |





## संपादकीय

विद्याधर ताठे

# वाचा श्रोतया ज्ञानाची, दिवाळी करी ।

दसरा सण मोठा, नाही आनंदा तोटा !

विजयादशमी तथा दसरा हा भारतीय सणांमधील एक प्रमुख सांस्कृतिक आनंदोत्सव आहे. शक्ती व भक्ती चा सुरेख संगम असलेला हा सण सर्जकतेचा स्वागत सोहळा आहे. नव्या उत्साहाने, नव्या प्रेरणेने, नव्या स्फूर्तीने, नव्या ध्येयाच्या वाटचालीचा हा आरंभ दिन असून विजय प्रस्थानाचाच उत्सव आहे. प्रभू रामचंद्राच्या काळापासून हा दिवस विजय प्रस्थानाचे प्रतिक बनलेला आहे. असा हा परमपावन मंगल दिन पतितपावन–भक्तवत्सल–करुणामूर्ती श्री साईबाबांचा पुण्यतिथीचा दिवस आहे ही गोष्ट साईभक्तांच्या दृष्टिने सोन्यास सुगंध लाभल्यासारखी अपूर्व आहे.

श्री साईबाबांचे वैशिष्ट्य म्हणजे इतर संतांसारखे त्यांनी कांहीही उपदेशपर लेखन केलेले नाही. पण बाबांचे अवघे जीवनचरित्र हाच मूर्तीमंत उपदेशच आहे. त्यांच्या प्रत्येक कृती व उक्ती मागे काहीना काही बोध दडलेला आहे. त्यांचे जीवन म्हणजे भूतदया व करुणा यांची मंगलप्रभात आहे. महावाक्यांचा बोध, वेदांच्या ऋचा, उपनिषद सूत्रे यांच्यातून प्रकट होणाऱ्या दिव्यतेचे, उत्कट दर्शन भक्तांना बाबांच्या ठायी होते. 'योगीया दुर्लभ तो म्या देखिला गे साजणी ।' असे योग्यांना सुद्धा दुर्लभ असणारे ईश्वरदर्शन आपणास साईरूपात सहज प्राप्त आहे हे साईभक्तांचे महद्‌भाग्य आहे.

बाबांचे जीवन म्हणजे नवे नवे सीमोल्लंघनच आहे. त्यांनी जातीभेद – पंथभेद – प्रांतभेद – भाषाभेद यांच्या सीमांचे उल्लंघन करून सीमोल्लंघनाची एक नवी दिशा समाजाला दिलेली आहे. मानवधर्माचे एक विशाल, उदात्त ध्येय भक्तांपुढे ठेवलेले आहे. अखिल मानव जातीबद्दलच नव्हे तर अखिल प्राणीमात्रांबद्दल त्यांना वाटणारी असीम करूणा अनुकंपा आज नव्या 'ग्लोबल व्हिलेज' झालेल्या विज्ञानवादी समाजातील नवी सामाजिक मूल्ये म्हणून प्रस्थापित होत आहे, ही गोष्ट बाबांच्या द्रष्टेपणाचीच महती आहे.

श्री बाबांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या शिकवणुकीचे पुण्यस्मरण व जागरण करण्याच्या हेतूने आम्ही 'श्रीसाईलीला' नियतकालिकाचा प्रस्तुत 'विशेषांक' सिद्ध केला असून महाराष्ट्रातील अनेक मान्यवर लेखकांनी या कार्यास सहकार्य देऊन आपले शुभाशिर्वाद दिले आहेत. आम्ही त्या सर्व मान्यवरांचे मन:पूर्वक आभारी आहोत. यापुढेही त्यांचे 'श्री साईलीला'स असेच लेखन सहकार्य लाभावे ही प्रार्थना.

गेल्या महिन्यात श्री साईबाबा संस्थानच्या विद्यमान विश्वस्त मंडळाच्या कारकिर्दीस एक वर्ष पूर्ण झाले आहे. दसऱ्याचा योग साधून आम्ही या अंकात कार्याचा आढावा दिला असून संस्थानच्या कारभाराबद्दल काही हितसंबंधीतांकडून घेतल्या जाणाऱ्या तथाकथित आक्षेपांना सडेतोड उत्तर देणारी मा. अध्यक्ष श्री. सुकथनकर यांची दीर्घ मुलाखतही आम्ही अंकात दिलेली आहे. भाविक भक्तांना यथायोग्य वस्तुस्थितीचे नेमके ज्ञान त्या परखड मुलाखतीद्वारे व्हावे अशी त्यामागे इच्छा आहे. 'झोपलेल्यास जागे करता येते, ढोंग करणारास नाही' अशी एक म्हण आहे. त्याप्रमाणे चुकीच्या माहितीने ज्यांनी आक्षेप घेतले त्यांना वस्तुस्थिती कळताच ते दूर होणार आहेत पण जाणूनबूजूनच जे ओरड करीत आहेत त्यांचे समाधान प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाही करता येणे शक्य नाही. असो.

प्रस्तूतचा 'श्री पुण्यतिथी विशेषांक' आप गोड मानून घ्यावा. काही त्रुटी आढळल्यास तिच्याकडे क्षमाशील हृदयाने दुर्लक्ष करून श्री बाबांच्या मुख्य शिकवणुकीकडे आपण लक्ष द्याल व त्या शिकवणुकीचे दिवे जागोजाग प्रज्वलित कराल अशी खात्री आहे. दसरा व दिवाळीच्या सहर्ष शुभेच्छा !

सूर्ये अधिष्ठिली प्राची । जगा राणीव दे प्रकाशाची ।
तैसी वाचा श्रोतया ज्ञानाची । दिवाळी करी ।

*– विद्याधर ताठे (कार्यकारी संपादक)*



# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## विश्वस्त मंडळ

**श्री. द. म. सुकथनकर**
**(अध्यक्ष)**

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मोहन मो. जयकर | (सदस्य) | श्री. भास्कर शं. बोरावके | (सदस्य) |
| श्री. रमेश दा. सोनी | '' | श्री. दयालाल हि. पटेल | '' |
| श्रीमती रेखा ग. दिघे | '' | श्री. राजीव पुं रोहोम | '' |
| श्री. प्रकाश व. कारखानीस | '' | श्री. संभाजी कि. काळे | '' |
| श्री. मुकेश र. पटेल | '' | श्री. अशोक भि. खांबेकर | '' |
| श्री. मधुकर द. जोशी | '' | सौ. प्रेमाबाई सो. बज | '' |
| श्री. प्रकाश पी. वैशंपायन | '' | श्री. रामचंद्र नि. गोसावी | '' |
| श्री. मधुकर ज. गर्दे पाटील | '' | श्री. प्रभाकर तु. बोरावके | '' |
| श्री. देवकीनंदन सारस्वत | '' | श्री. सोपान मा. घोरडे | '' |
| श्री. आप्पासाहेब खं. कोते | '' | श्री. रायभान ग. चिने | '' |

श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील (सदस्य)





# श्री साईबाबा संस्थान शिरडी विद्यमान विश्वस्त मंडळाचे वर्षभरातील कार्य.

**श्री साईबाबा संस्थान शिरडी चे व्यवस्थापन पाहण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्य सचिव मा. श्री. द. म. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखालील नवनियुक्त विश्वस्त मंडळ दि. १ सप्टेंबर १९९४ रोजी कार्यरत झाले. या विश्वस्त मंडळाच्या कारकिर्दीस नुकतेच १ वर्ष पूर्ण झाले असून मंडळाने वर्षभरात केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा आम्ही साईभक्तांच्या माहितीसाठी येथे देत आहोत -**

माननीय श्री. द. म. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखालील नूतन विश्वस्त मंडळाने दि. १ सप्टेंबर, १९९४ पासून श्री साईबाबा संस्थान, शिरडी' चा कारभार हाती घेतला असून नुकतेच या मंडळाच्या कारकीर्दीस एक वर्षपूर्ण झालेले आहे. या काळात विश्वस्त मंडळाने पुढील महत्त्वाची कामे केलेली आहेत-

**अभिषेक शुल्क कमी केले :**

श्री साईबाबांच्या भक्तांना यापूर्वी अभिषेकासाठी रु. १०१/- द्यावे लागत होते. नव्या विश्वस्त मंडळाने हे शुल्क कमी केले असून केवळ रु. २५/- भरुन दोन व्यक्तिंना अभिषेक करण्याची सोय करण्यात आलेली आहे.

**दर्शनव्यवस्था सुलभ :**

लेंडी बागेतील दर्शनव्यवस्थेतील लाकडी व बाबूंचे कटडे (रेलिंग) काढून टाकून तेथे अत्यंत सुटसुटीत व तत्परतेने हलविता येतील अशा प्रकारचे लोखंडी रेलींग करण्यात आले आहे. चिखल होऊ नये व एकूण स्वच्छतेसाठी सर्वत्र लाद्या बसविण्यात आल्या आहेत. तेथे उतरणाऱ्या पालख्यांची व्यवस्था अधिक चांगल्या प्रकारे केलेली आहे. तसेच ताडपत्रीचे छत घालून भक्तांचे उन-वाऱ्यापासून-पावसापासून संरक्षण करण्यात आले आहे.

**स्वच्छता :-**

सर्व भक्तनिवासांची स्वच्छता व देखभाल यांकडे समितीने अधिक लक्ष दिले असून त्यासाठी कंत्राटी पद्धतीने स्वच्छता करुन घेण्यात येत आहे व या कामावरील सर्वसाधारण देखरेखीसाठी विश्वस्त मंडळांची एक उपसमितीही नियुक्त करण्यात आली आहे.

**आकर्षक रंगकाम :-**

संस्थानच्या सर्व इमारतींना व मंदिरांस सुंदर-सुबक व आकर्षक रंग देऊन विश्वस्तमंडळाने सर्वत्र प्रसन्न वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**थंडपाणी :-**

संस्थानच्या परिसरातील पिण्याच्या पाण्याच्या सर्व ठिकाणी कुलर्स बसवून भक्तांना थंडगार पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**नव्या ४५० खोल्या खुल्या :-**

शिरडीस येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन मंडळाने नवीन भक्तनिवासातील सुमारे ४५० खोल्या भक्तांसाठी सर्व मूलभूत सोयींसह उपलब्ध करून दिल्या आहेत.

**मोफत बससेवा :-**

भक्तनिवासापासून श्री साईबाबा मंदिरा पर्यंत भक्तांना ये-जा करण्यास संस्थानतर्फे मोफत बस व्यवस्था करण्यात आली आहे.

**ताडपत्रीचा मंडप :-**

सरंजाम बागेतही भक्तांच्या सोयीसाठी ताडपत्रीचा भव्य मंडप उभारण्यात आला आहे.

**पारायण व्यवस्था :-**

श्री साईसचरित ग्रंथाचे पारायण करु इच्छिणाऱ्या भक्तांची वाढती संख्या लक्षात घेऊन शामसुंदर हॉल मध्ये स्वतंत्रपणे पारायणाची व्यवस्था करण्यात आली आहे.





**नारळ फोडण्याचे यंत्र :-**

नारळ फोडण्यासाठी भक्तांची एकत्र होणारी गर्दी व तेथील अस्वच्छता लक्षात घेऊन मंडळाने नारळ फोडण्यासाठी खास यंत्राची व्यवस्था केली आहे.

**प्रसाधनगृह :-**

श्री शिरडी येथे मुक्काम न करता केवळ दर्शनासाठीच काही वेळ येणाऱ्या भाविकांसाठी प्रसाधनगृहाची व लॉकर्सची व्यवस्था अधिक मोठ्या प्रमाणावर असण्याची गरज लक्षात घेऊन मंडळाने ६० संडास ६० स्नानगृहांचे भव्य प्रसाधनगृह बांधण्यास प्रारंभ केला आहे. त्यात महिलांसाठी स्वतंत्र सोय करण्यात आली आहे.

**क्रॉंक्रीटचे रस्ते :-**

मंदिर परिसराबरोबरच हद्दीबाहेरच्या रस्त्यांचे विश्वस्त मंडळाने क्रॉंक्रटीकरण केले असून मनमाड रस्त्यावरील भाविकांची खूप वर्दळ असणाऱ्या फूटपाथावर संस्थानने फरशी बसवून भाविकांची सोय केलेली आहे.

**वार्षिक दैनंदिनी :-**

संस्थानतर्फे दरवर्षी प्रकाशित होणारी वार्षिक दैनंदिनी (डायरी) १ जानेवारी ते ३१ डिसेंबर ९६ अशी इंग्रजी वर्षानुसार प्रसिद्ध करण्याचा निर्णय विश्वस्त मंडळाने घेतला आहे. चैत्रप्रतिपदेस एप्रिलमध्ये प्रसिद्ध होणारी डायरी फारशी उपयुक्त ठरत नाही. अशा स्वरुपांच्या अनेक भक्तांच्या सूचना लक्षात घेऊन मंडळाने हा निर्णय घेतला आहे.

**कार्यकारी संपादक नियुक्ती :-**

'श्री साईलीला' नियतकालीकाचे प्रकाशन नियमितपणे दर्जेदार व अत्यंत वाचनीय स्वरुपात होण्याच्या दृष्टिने विश्वस्त मंडळाने अनुभवी पत्रकार संतसाहित्याचे गाढे अभ्यासक **श्री. विद्याधर ताठे** यांची नियुक्ती करुन 'श्री साईलीला' प्रकाशनाकडे अधिक लक्ष पुरविले आहे.

**लेखक-कवि संमेलन :**

'श्री साईलीला' नियतकालिकाच्या 'लेखक-कविंचे संमेलन' हा उपक्रम गेली काही वर्ष बंद पडला होता. विद्यमान विश्वस्त मंडळान यंदा तो उपक्रम पुन्हा सुरु केला. दि. ४ व ५ मार्च ९५ रोजी शिरडी येथे लेखक-कवि संमेलन उत्तम प्रतिसादासह संपन्न झाले.

**प्रसादात लाडू :-**

भक्तांना जेवणात एक रुपयाचा लाडू अधिक मूल्य न घेता प्रसाद म्हणून देण्याची विश्वस्त मंडळाने सुरुवात केलेली आहे.

**रुग्णालयातील अत्याधुनिक सोई :-**

संस्थानतर्फे चालविल्या जाणाऱ्या शिरडी येथील श्री साईनाथ रुग्णालयातील विविध विभाग आधुनिक सामुग्रीने अधिकाधिक सज्ज करण्याचा विश्वस्त मंडळाचा प्रयत्न आहे. या संबंधातील काही निर्णय पुढीलप्रमाणे -

- ✡ डायलिसीस सुविधा सुरू करणे.
- ✡ प्रयोगशाळेत मायक्रोबायोलॉजी व हिस्टोपॅथॉलॉजी विभाग सुरु करणे.
- ✡ दोन कृत्रिम रेस्पिरेटर्स घेणे.
- ✡ दंत विभागासाठी लाईट वयुअर सिस्टीम मशिन व अल्ट्रासोनिक स्केलर घेणे.
- ✡ बाह्यरुग्ण विभागासाठी रेडियंट हिट वॉर्मर व फोटो थेरपी युनीट घेणे.
- ✡ अत्याधुनिक 'बेबी इनक्युबेटर' घेणे. या सोयींची उभारणी सुरु आहे व ती लवकरच पूर्ण होईल.

**अनुदान तरतुदीत वाढ :-**

संस्थानतर्फे दरवर्षी हृदयशस्त्रक्रिया, किडनी रोग, कॅन्सर अशा वरील उपचारांसाठी अनेक गरजू रुग्णांना अनुदान दिले जाते. त्यासाठी असलेल्या १५ लाख तरतुदीची रक्कम विश्वस्त मंडळाने दुप्पट करुन ३० लाख रुपये कली आहे. व अधिक रुग्णांना संस्थानतर्फे अनुदान देण्यात येत आहे.

**मोतीबिंदू शिबीर :-**

प्रथेप्रमाणे संस्थानतर्फे याही वर्षात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर व अपंगांसाठी जयपूर फूट बसविण्याचे शिबीर घेण्यात आले. (१०एप्रिल ९५)

**आय. टी. आय. मध्ये नवा अभ्यासक्रम :-**

संस्थानच्या आय. टी. आय. संस्थेत 'टूल ॲण्ड डाय मेकर' व 'टर्नर' हे दोन जादा अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्यात आले. असेच संस्थानच्या कन्या शाळेत शिवणवर्ग सुरु करण्यात आले.

**कीर्तन प्रबोधिनी :-**

संतकवि दासगणू हे श्री साईबाबांच्या आदेशाने व कृपेने कीर्तनकार झाले. त्यांचे स्मरण म्हणून गोरटे येथे कीर्तन प्रबोधिनी (महाविद्यालय) सुरु करण्याचा तत्वत: निर्णय घेतला आहे.

असे अनेक निर्णय मंडळाने केले असून भक्त भविकांना विश्वस्त मंडळाच्या कार्याचा थोडक्यात परिचय व्हावा म्हणून अगदी संक्षेपानेच दिले आहेत.

**(संकलन : विद्याधर ताठे)**
कार्यकारी संपादक

卐 卐 卐

**शिरडीची साईची समाधि।**
**तीचि अखिल संताची मांदी।**
**जेथिल मार्ग क्रमितां प्रतिपदीं।**
**तुटते ग्रंथी जीवाची ॥**



# ॥ ॐ ॥



## नमस्काराष्टक



अनंता तुला तें कसें रे स्तवावें । अनंता तुला तें केसें रे नमावें ।
अनंता मुखांचा शिणे शेष गातां । नमस्कार साष्टांग श्रीसाईनाथा ॥१॥

स्मरावें मनीं त्वत्पदां नित्य भावें । उरावें तरी भक्तिसाठी स्वभावें ॥
तरावें जगा तारुनी मायताता । नमस्कार ॥२॥

वसे जो सदा दावया संतलीला । दिसे अज्ञ लोकांपरी जो जनांला ॥
परी अंतरीं ज्ञान कैवल्य दाता । नमस्कार ॥३॥

बरा लाधला जन्म हा मानवाचा । नरा सार्थका साधनीभूत साचा ॥
धरूं साईप्रेमा गळाचा अहंता । नमस्कार ॥४॥

धरावें करीं सान अल्पज्ञ बाला । रावें आम्हां धन्य चुंबोनि गाला ॥
मुखीं घाल प्रेमें खरा ग्रासत आतां । नमस्कार ॥५॥

सुरादीक ज्यांच्या पदा वंदिताति । शुकादीक ज्यांचे समानत्व देती ॥
प्रयागादि तीर्थें पदीं नम्र होतां । नमस्कार ॥६॥

तुझ्या ज्या पदा पाहतां गोपबाली । सदा रंगली चित्स्वरूपीं मिळाली ॥
करी रासक्रीडा सवें कृष्णनाथा । नमस्कार ॥७॥

तुला मागतों मागणें एक द्यावें । करा जोंडितों दीन अत्यंत भावें ॥
भवीं मोहनीराज हा तारिं आतां । नमस्कार साष्टांग साईनाथा ॥८॥





# प्रार्थना

शेख अब्दुलरझाऊ शाह बियाबानी

प्रेमाने मी वंदन करितो प्रभुराया तुजला
शरण मी आलो चरणकमळी आश्रय दे मजला

गुरफटलो मी संसारी या खुद्द कसा देवा
नविन भक्ती हीच माझी मानुनी घे सेवा

संसाराची शुभ सुरवात प्रेमाने करविली
सात्त्विक प्रेम आणि विषयवासना दुभंगुनी दाविली

प्रेमसागरा ब्रह्मानंदा वेडा मी झालो
सर्वस्वाची होळी करूनी शरण तुला आलो

तजोमय तू प्रकाश दीपक प्रकाशमय विश्व
ब्रह्मांडी ते पिंडी आहे, हृदयातचि विश्व

फुलपाखरे अणू-रेणूवर प्रेम जडू लागले
विश्व चराचर अवघे मजला प्रेममय जाहले

शब्द बोल हे खरे करून सच्चिनानंद दे
प्रकाशदीपक दिव्य तुझे ते मोहन दर्शन दे